विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
शिक्षा मंत्रालय, भारत सरकार
(Ministry of Education , Govt. of India)
बहादुरशाह जफर मार्ग नई दिल्ली– 110 002
Bahadurshah Zafar Marg, New Delhi-110002
Phone: 011-23604407, 011-23604404

सत्यमेव जयते

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

By Speed Post

No.F.8-18/2026(CPP-I/PU)/182825 **August, 2026**

21 AUG 2026

The President
Shivraya Maharashtra State Skill University
Tadwal Railway Station, Algi Road
Akkalkot, Solapur
Maharashtra - 413219

Subject: - *To enlist the name of Shivraya Maharashtra State Skill University, Solapur, Maharashtra, in the UGC list- regarding*

Sir,

With reference to your letter Ref. No. 86/2026 dated 11.07.2026 on the subject cited above; I am directed to request you to submit the following information/documents duly attested by the Vice Chancellor/Registrar of the University:

1. Attested copy the Act (English Version).
2. Attested copy of Notification issued by the Government of Maharashtra, if any (English Version).
3. Contact details of the Vice Chancellor and Registrar of the University i.e. phone number and e-mail IDs.
4. Official website address of the University.

Yours faithfully,

(Lokesh Kumar Jangra)
Under Secretary

20/08/2026

Website : rajbhavan-maharashtra.gov.in
Email : secy.rb-mh@nic.in

सत्यमेव जयते

राज्यपालांचे सचिवालय
Governor's Secretariat
Walkeshwar Road, Malabar Hill, Mumbai-400 035
वाळकेश्वर रोड, मलबार हिल, मुंबई - ४०० ०३५
MAHARASHTRA महाराष्ट्र

No.: RB/Gen-2026/D-10123666/EDN-3/ २९६ दिनांक : २४ एप्रिल २०२६.

प्रति,

अतिरिक्त मुख्य सचिव,
कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

विषय : महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, सोलापूर स्थापना/ मान्यतेबाबत.

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयाबाबत श्री. आण्णाप्पा सुराणा इसुरे, अध्यक्ष, अनुराग कृषी शिक्षण व संशोधन संस्था, सोलापूर, यांनी मा. राज्यपाल महोदयांना लिहिलेल्या दिनांक ०८.०४.२०२६, रोजीच्या पत्रातील विषय आपल्या विभागाच्या खत्यारीत येत असल्याने सदर पत्र, आपल्या स्तरावर नियमानुसार पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

आदरपूर्वक.

आपला,
24/4/2026
(विकास कुलकर्णी)
मा. राज्यपालांचे अवर सचिव (शिक्षण) (प्रभारी)

प्रत: श्री. आण्णाप्पा सुराणा इसुरे, अध्यक्ष, अनुराग कृषी शिक्षण व संशोधन संस्था, तडवळ रेल्वे स्टेशन, अळगी रोड, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर - ४१३ २१९, यांना माहितीसाठी रवाना.

आपला,
24/4/2026
(विकास कुलकर्णी)
मा. राज्यपालांचे अवर सचिव (शिक्षण) (प्रभारी).

o/c
24/4/26

Governor's Secretariat
Education Section
DISPATCHED
24/04/2026

महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,
मुख्य इमारत, कक्ष क्रमांक २०४, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
ई-मेल :- desk-epren.sdeed-mh@gov.in

क्र.कौविवि-२०२६/प्र.क्र.४६/उद्योजकता दिनांक: ०२ जून,२०२६

प्रति,

श्री. अण्णाप्पा सुराप्पा इसुरे,
अध्यक्ष, अनुराग कृषी शिक्षण व संशोधन संस्था,
तडवळ रेल्वे स्टेशन,अळगी रोड, ता.अक्कलकोट,
जि.सोलापूर-४१३२१९.

विषय :- महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, सोलापूर स्थापना/ मान्यतेबाबत
संदर्भ : मा. राज्यपालांचे अवर सचिव (शिक्षण) (प्रभारी) यांचे क्र.RB/Gen-2026/D-10123666/EDN-3/266, दि.२४ एप्रिल,२०२६ चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपण मा. राज्यपाल कार्यालयास सादर केलेला प्रस्ताव तसेच संदर्भाधिन मा. राज्यपाल कार्यालयाच्या पत्रास अनुसरून, आपली उप सचिव , कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार, राज्यात कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर कौशल्य विद्यापीठांची स्थापना, त्यांच्या कामकाजाची व कार्याचे विनियमन करण्याकरीता शासन निर्णय दि.०५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये निर्गमित मार्गदर्शक सूचना तसेच "महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४" (सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५) दि. ०७ ऑगस्ट, २०२४ ची प्रत प्रत्यक्षरीत्या आपणास देण्यात आली असून सदर मार्गदर्शक सूचना व अधिनियमाची प्रत पुन:श्च पाठविण्यात येत आहे.

आपली,

(प्रणाली गोसावी-यादव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा. राज्यपालांचे अवर सचिव (शिक्षण) (प्रभारी), लोकभवन, मलबार हिल,मुंबई
२. निवडनस्ती (उद्योजकता)

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभाग
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र
महाराष्ट्र राज्य तांत्रिक प्रशाला परीसर, (नॉर्थकोट), पार्क चौक, सोलापूर
दुरध्वनी क्र.(०२१७) २९७०९७६
ई-मेल-asstdiremp.solapur@ese.maharahstra.gov.in
संकेतस्थळ-:- https://rojgar.mahaswayam.gov.in

जा.क्र.३४/जिकौविरोवउसो/कौवि/१२१५ /२०२६ दि.१०/०७/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य,
अनुराग कृषी शिक्षण व संशोधन संस्था,
तडवळ रेल्वे स्टेशन, आळगी रोड,
ता. अक्कलकोट जि.सोलापूर

विषय- प्रमोद महाजन कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत प्रशिक्षण संस्था सुरु करणेबाबत...

संदर्भ- जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचे पत्र क्र.(संकीर्ण-३) दिनांक २२/०६/२०२६ या कार्यालयास प्राप्त पत्र दि.०२/०७/२०२६

महोदय,

उपरोक्त संदर्भाकित पत्रान्वये, आपला प्रस्ताव या कार्यालायास दि.०२/०७/२०२६ रोजी प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने प्रमोद महाजन कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत आपली संस्था रजिस्टर करण्याकरिता खालीलप्रमाणे प्रक्रिया राबवावी.

➢ **प्रथमतः आपणास** Skill India Portal (SIDH) **वर** Training Provider (TP) Registration **करावे लागेल. त्याकरिता-**

१. Skill India Digital Hub वर जा.
२. Register वर क्लिक करा.
३. User Category मध्ये Training Provider (TP) निवडा.
४. SPOC (Single Point of Contact) ची माहिती भरा.
५. मोबाईल आणि ई-मेलवर आलेला OTP टाकून पडताळणी करा.
६. OTP पडताळणीनंतर TP ID आणि तात्पुरता पासवर्ड मिळेल. त्याद्वारे लॉगिन करून नवीन पासवर्ड सेट करा.
७. आता Training Provider Registration Form पूर्ण भरा
    - संस्थेचा प्रकार (Government/Non-Government)
    - संस्थेचे नाव
    - स्थापना वर्ष
    - CEO/Director/Head यांची माहिती
    - PAN, GST (लागू असल्यास)
    - नोंदणी प्रमाणपत्र
    - पत्ता पुरावा
    - इतर आवश्यक कागदपत्रे अपलोड करा.
८. सर्व माहिती तपासून Submit करा.
९. पडताळणी पूर्ण झाल्यानंतर TP खाते सक्रिय होईल. त्यानंतर Training Centre तयार करणे, Centre Accreditation & Affiliation (CAAF) साठी अर्ज करणे.

TP Registration झाल्यानंतर TC Registration करणेकरिता खालील प्रक्रिया करावी लागेल-
(Training Centre (TC) Registration करण्यासाठी साधारणपणे आधी Training Provider (TP) नोंदणीकृत असणे आवश्यक असते .TC Registration ही TP लॉगिनमधून केली जाते.)

१. Skill India Digital Hub वर आपल्या TP ID ने लॉगिन करा.
२. Training Centre / My Centres किंवा Create Training Centre हा पर्याय निवडा.
३. नवीन Training Centre तयार करण्यासाठी खालील माहिती भरा:

- Training Centre चे नाव
- पूर्ण पत्ता
- राज्य, जिल्हा, पिनकोड
- SPOC (Single Point of Contact) चे नाव, मोबाईल आणि ई-मेल
- Centre ची पायाभूत सुविधा (Classrooms, Labs, Equipment इ.)

४. आवश्यक कागदपत्रे अपलोड करा, जसे:

- Address Proof
- Building Ownership / Rent Agreement
- Centre चे फोटो
- आवश्यक असल्यास Fire Safety, Electricity इत्यादी कागदपत्रे

५. अर्ज Submit करा.
६. अर्जाची पडताळणी झाल्यानंतर TC ID आणि लॉगिन तपशील SPOC ला उपलब्ध करून दिले जातात. ७.
७.TC सक्रिय झाल्यावर:

- Trainer Linking
- Batch Creation
- Candidate Enrollment
- Scheme Mapping ही कामे TC लॉगिनमधून करता येतात.

वरीलप्रमाणे सर्व प्रक्रिया youtube पाहण्यासाठी -

https://youtu.be/T92XDKt70gg?si=dorOFMCgLlvSH0pa
https://youtu.be/chWTKBJiUC8
https://youtu.be/ei1mnJ6pxlk
https://youtu.be/T92XDKt70gg

याव्यतिरिक्त आपणास वरील प्रक्रिया राबविण्याकरिता काही अडचण आल्यास या कार्यालयास संपर्क करावा संपर्क क्रमांक-.(०२१७) २९५०९५६.

आपली

Bhandare 10/7/26

(सुनीता खंदारे)
सहायक आयुक्त
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता
सोलापूर

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभाग
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र
महाराष्ट्र राज्य तांत्रिक प्रशाला परीसर, (नॉर्थकोट), पार्क चौक, सोलापूर
दुरध्वनी क्र.(०२१७) २९७०९७६
ई-मेल-asstdiremp.solapur@ese.maharahstra.gov.in
संकेतस्थळ-:- https://rojgar.mahaswayam.gov.in



जा.क्र.३४/जिकौविरोवउसो/कौवि/२३७१/२०२६ दि.२७/०७/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य,
शिवराया महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ,
तडवळ रेल्वे स्टेशन, आळगी रोड,
ता. अक्कलकोट जि.सोलापूर

विषय- प्रमोद महाजन कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत प्रशिक्षण संस्था सुरु करणेबाबत...

संदर्भ- आपले पत्र क्र.९६/२०२६ दिनांक १३/०७/२०२६

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे शासन निर्णय क्र.जावँप्र-२०२३/प्र.क्र.०६/व्यशि-४ दिनांक १८ डिसेंबर, २०२३ नुसार आपला प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

याकरिता सोबत अद्ययावत कोर्स मास्टर्स जोडत आहोत. admin.skillindiadigital.gov.in/qplist वर अधिक माहिती उपलब्ध आहे.

आपली

सोबत- व.प्र.

SBhandare
(संगीता खंदारे)
सहायक आयुक्त
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता
सोलापूर

RNI No. MAHBIL /2009/35530

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक १४] बुधवार, ऑगस्ट ७, २०२४/श्रावण १६, शके १९४६ [पृष्ठे ३४, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ३९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

पृष्ठे

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.—महाराष्ट्र राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठांशी संबंधित असणाऱ्या कायद्यांचे एकीकरण, एकत्रीकरण व सुधारणा करण्यासाठी आणि कौशल्य शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठांची स्थापना, विधिसंस्थापन व विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता कायदा अधिनियमित करण्यासाठी अधिनियम. १-३४

दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सतिश वाघोले,
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ७ ऑगस्ट २०२४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठांशी संबंधित असणाऱ्या कायद्यांचे एकीकरण, एकत्रीकरण व सुधारणा करण्यासाठी आणि कौशल्य शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठांची स्थापना, विधिसंस्थापन व विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता कायदा अधिनियमित करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठांशी संबंधित असणाऱ्या कायद्यांचे एकीकरण, एकत्रीकरण व सुधारणा करण्यासाठी आणि कौशल्य शिक्षणाचा विकास

व अभिवृद्धी करण्याकरिता स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठांची स्थापना, विधिसंस्थापन व विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास, अंमलात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) " विद्या परिषद " याचा अर्थ, विद्यापीठाची विद्यापरिषद, असा आहे ;

(ख) " संलग्न प्राध्यापक ", " संलग्न सहयोगी प्राध्यापक ", " संलग्न सहायक प्राध्यापक " किंवा " व्यवसायी प्राध्यापक " यांचा अर्थ, विद्यापीठाबरोबरच्या सहयोगाच्या किंवा साहचर्याच्या कालावधीत जी तशी पदनिर्देशित केली आहे अशी उद्योग, उत्पादन व सेवाक्षेत्र, औद्योगिक संघटना, व्यापार, कृषी, वाणिज्य, सामाजिक, सांस्कृतिक, विद्याविषयक किंवा इतर कोणत्याही संलग्न क्षेत्रांतील व्यक्ती, असा आहे ;

(ग) " शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण " याचा अर्थ, शिकाऊ उमेदवारीच्या करारानुसार आणि शिकाऊ उमेदवारींच्या विविध संवर्गांसाठी वेगवेगळ्या असतील अशा विहित केलेल्या अटी व शर्ती या अन्वये सुरू असलेला कोणत्याही उद्योगामधील किंवा आस्थापनेमधील प्रशिक्षण पाठ्यक्रम, असा आहे ;

(घ) " प्राधिकरणे " याचा अर्थ, या अधिनियमात किंवा त्याअन्वये विनिर्दिष्ट केलेली विद्यापीठाची प्राधिकरणे, असा आहे ;

(ङ) " व्यवस्थापन मंडळ " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम २८ अन्वये घटित केलेले व्यवस्थापन मंडळ, असा आहे ;

(च) " विद्यापीठ परिसर " याचा अर्थ, ज्या क्षेत्रात विद्यापीठ स्थापन केले आहे ते विद्यापीठाचे क्षेत्र, असा आहे ;

(छ) " उत्कृष्टता केंद्र " याचा अर्थ, विद्यार्थी, सेवेतील कर्मचारी, काम करणारे व्यावसायिक यांना सर्व प्रकारच्या कौशल्यांची तरतूद करण्यासाठी आणि संयुक्त प्रकल्प हाती घेण्यासाठी उद्योग समुहाच्या सहयोगाने किंवा उद्योग व समाजाच्या लाभासाठी स्थापन केलेले अद्ययावत प्रशिक्षण किंवा संशोधन केंद्र, असा आहे ;

(ज) " घटक संस्था " याचा अर्थ, विद्यापीठाच्या कक्षेत येणाऱ्या प्रायोजक मंडळाने स्थापन केलेले महाविद्यालय किंवा विभाग किंवा प्रशाला किंवा केंद्र किंवा संस्था, असा आहे ;

(झ) " कर्मचारी " याचा अर्थ, विद्यापीठाने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, विद्यापीठांचे अध्यापक, अधिकारी व इतर कर्मचारीवर्ग यांचा समावेश होता ;

(ञ) " विद्यमान विद्यापीठ " याचा अर्थ, अनुसूचीच्या भाग-एक मध्ये विनिर्दिष्ट केलेले विद्यापीठ, असा आहे ;

(ट) " विद्याशाखा " याचा अर्थ, विद्यापीठाची विद्याशाखा, असा आहे ;

(ठ) " शुल्क " याचा अर्थ, विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाने किंवा त्याच्या महाविद्यालयांनी, परिसंस्थांनी, कौशल्य केंद्रांनी, किंवा, यथास्थिति, अभ्यास केंद्रांनी वसूल केलेले, विकास आकारासह जे ना-परतावा योग्य असेल असे शिकवणी शुल्क, इतर शुल्क व आकार, मग ते कोणत्याही नावाने संबोधले जावो, असा आहे आणि त्यात त्याचा समावेश होतो ;

(ड) " शासन " किंवा " राज्य शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ढ) " नियामक मंडळ " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम २७ अन्वये घटित केलेले नियामक मंडळ, असा आहे ;

(ण) " वसतिगृह " याचा अर्थ, विद्यापीठाने स्थापन केलेले किंवा मान्यता दिलेले असे, विद्यापीठाच्या किंवा त्याच्या महाविद्यालयांच्या, परिसंस्थांच्या कौशल्य केंद्रांच्या किंवा अभ्यासकेंद्रांच्या विद्यार्थ्यांसाठी असलेले निवासस्थान, असा आहे ;

(त) " अधिसूचना " याचा अर्थ, **शासकीय राजपत्रात,** प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे ;

(थ) " **शासकीय राजपत्र** " याचा अर्थ, **महाराष्ट्र शासनाचे राजपत्र,** असा आहे ;

(द) " नोकरीकालीन प्रशिक्षण " याचा अर्थ, प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना त्यांची कामे पार पाडण्यासाठी ज्यात, प्रत्यक्षपणे शिक्षण दिले जाते ते तंत्र असा आहे ;

(ध) " ऑनलाईन व दूरस्थ शिक्षण " याचा अर्थ, प्रसारण, दूरप्रक्षेपण, माहिती संप्रेषण तंत्रज्ञान, ऑनलाईन, संपर्क कार्यक्रम आणि इतर कोणतीही मिश्रित पद्धती यांसारख्या, संज्ञापनाच्या कोणत्याही दोन किंवा अधिक माध्यमांच्या संयोगातून दिलेले शिक्षण, असा आहे ;

(न) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये केलेले नियम, परिनियम, आदेश किंवा, यथास्थिति, विनियमयांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(प) " अध्यक्ष " याचा अर्थ, विद्यापीठाचा अध्यक्ष, असा असून जो विद्यापीठाचा कुलपती देखील असेल ;

(फ) " विनियामक मंडळ " याचा अर्थ, शिक्षणाचा विद्याविषयक दर्जा सुनिश्चित करण्याची, मानके व शर्ती निर्धारित करण्याकरिता केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने स्थापन केलेले मंडळ, असा आहे ;

(ब) " नियम " याचा अर्थ, राज्य शासनाने विहित केलेले नियम, असा आहे ;

(भ) " अनुसूची " याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(म) " कलम " याचा अर्थ, या अधिनियमाचे कलम, असा आहे ;

(य) " कौशल्य केंद्र " याचा अर्थ, उद्योग, विद्यार्थी, स्थानिक लोक आणि सर्व हितसंबंधित घटक यांच्या लाभासाठी, कौशल्य प्रशिक्षण देण्याकरिता, विद्यापीठाने स्थापन केलेले किंवा उद्योगसमूह, उद्योग संघ, कार्पोरेट कंपन्या व व्यावसायिक यांनी विद्यापीठाकडे विस्तारित केलेले प्रशिक्षण केंद्र, असा आहे ;

(यक) " कौशल्य विभाग " याचा अर्थ, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(यख) या अधिनियमाखाली स्थापन केलेल्या विद्यापीठाच्या संबंधात, " प्रायोजक मंडळ " याचा अर्थ,—

१८६० चा २१. (एक) सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी केलेली सोसायटी ; किंवा

१९५० चा २९. (दोन) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमान्वये नोंदणी केलेला सार्वजनिक न्यास ; किंवा

१९५६ चा १. २०१३ चा ८. (तीन) कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम २५ अन्वये स्थापन केलेली कोणतीही शैक्षणिक संस्था किंवा कंपनी अधिनियम, २०१३ अन्वये नोंदणी केलेली कंपनी,

असा आहे ;

(यग) "राज्य" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(यघ) " परिनियम ", " आदेश " व " विनियम " यांचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले विद्यापीठाचे अनुक्रमे परिनियम, आदेश व विनियम, असा आहे ;

(यङ) " विद्यार्थी " याचा अर्थ, विद्यापीठाने सुरू केलेली पदव्युत्तर पदवी, विद्यावाचस्पती पदवी आणि संशोधन पदवी यांसह पदवी, पदविका किंवा अन्य विद्याविषयक विशेषोपाध्या यांकरिता अध्ययनक्रम घेण्यासाठी विद्यापीठात नाव नोंदणी केलेली व्यक्ती, असा आहे ;

(यच) " अभ्यास केंद्र " याचा अर्थ, विद्यापीठाने देऊ केलेले ऑनलाईन व दूरस्थ शिक्षण यांसह सर्व पाठ्यक्रमांच्या संदर्भात, विद्यार्थ्यांना आवश्यक असलेला सल्ला, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन किंवा इतर कोणतेही सहाय्य देण्याच्या प्रयोजनार्थ, विद्यापीठाने स्थापन केलेले व चालविलेले केंद्र, असा आहे ;

(यछ) " अध्यापक " याचा अर्थ, विद्यापीठाच्या एखाद्या अभ्यास पाठ्यक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण, कौशल्य शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी किंवा संशोधनात मार्गदर्शन करण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन करण्यासाठी आवश्यक असलेले प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, संलग्न प्राध्यापक, व्यवसायी प्राध्यापक, उद्योगतज्ज्ञ किंवा विशेषतज्ज्ञ किंवा इतर कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(यज) " विद्यापीठ " याचा अर्थ, अनुसूचीमध्ये नमूद केलेले स्वयं-अर्थसहायित खाजगी कौशल्ये विद्यापीठ, असा आहे.

विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल.

३. (१) या अधिनियमान्वये स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यास इच्छुक असणारे कोणतेही प्रायोजक मंडळ (शैक्षणिक कार्य करणाऱ्या कोणत्याही खाजगी परिसंस्थेसह), कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्याचा प्रस्ताव अंतर्भूत असणाऱ्या सविस्तर प्रकल्प अहवालासह अर्ज, शासन, आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा रीतीने व अशा प्रक्रिया शुल्कासह, शासनास सादर करील.

(२) सविस्तर प्रकल्प अहवालात पुढील तपशिलांचा अंतर्भाव असेल :—

(एक) पोट-कलम (१) अन्वये अर्ज सादर करणाऱ्या प्रायोजक मंडळाचे नोंदणी प्रमाणपत्र, त्याची घटना व त्याचे उप-विधी यांच्या प्रतींसह त्याची तपशिलवार माहिती ;

(दोन) शैक्षणिक कार्यक्रम चालविणाऱ्या विद्यमान संस्थांच्या बाबतीत, मागील तीन वर्षांच्या लेखापरीक्षित लेख्यांसह प्रायोजक मंडळाच्या आर्थिक साधन स्रोतांसंबंधीची माहिती किंवा नव्याने स्थापन झालेल्या प्रायोजक मंडळाच्या बाबतीत, सनदी लेखापालाकडून यथोचितरीत्या प्रमाणित करण्यात आलेली आर्थिक साधनस्रोत निर्माण करण्यासाठीची योजना ;

(तीन) प्रस्तावित कौशल्य विद्यापीठाचे नाव, ठिकाण आणि मुख्यालय ;

(चार) प्रस्तावित कौशल्य विद्यापीठाची उद्दिष्टे ;

(पाच) विनियामक मंडळाच्या लागू असलेल्या विनियमांचे अनुपालन करून, जमिनीची उपलब्धता तसेच इमारती व पायाभूत सुविधा, याअगोदरच अस्तित्वात असतील तर, यांचे तपशील; किंवा जमीन संपादनाकरिता, इमारतीच्या बांधकामाकरिता व पायाभूत सुविधा प्रस्थापित करण्याकरिता बृहत् योजना ;

(सहा) अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारी कोणतेही असल्यास त्यांच्यासह, प्रायोजक मंडळाकडे कामाचा निपटारा करण्यासाठी असलेली प्रस्तावित योजना व विद्याविषयक सुविधांची उपलब्धता ;

(सात) विद्यापीठ कार्यरत होण्यापूर्वी इमारती बांधणे, संरचनात्मक सोयींचा व पायाभूत सुविधांचा विकास करणे आणि साधनसामग्री मिळविणे, इत्यादी यांसारख्या विद्यापीठ परिसर विकासाच्या योजनांचा तपशील आणि पहिल्या पाच वर्षांमधील कार्यक्रमांची टप्पानिहाय रुपरेषा ;

(आठ) पुढील पाच वर्षांसाठी प्रस्तावित केलेल्या भांडवली खर्चाचा टप्पानिहाय विनियोग आणि त्याचे वित्तीय स्रोत ;

(नऊ) विद्यापीठाने हाती घेण्याचे प्रस्तावित केलेल्या, अभ्यास आणि संशोधन अध्ययनक्रमांचे स्वरुप व प्रकार आणि राज्याची विकासविषयक उद्दिष्टे व रोजगारविषयक गरजा यांच्या संदर्भात असलेली त्यांची प्रासंगिकता आणि पहिल्या पाच वर्षांमधील, अशा कार्यक्रमांचे पाठ्यक्रमनिहाय प्रवेश लक्ष्यांसह टप्पानिहाय रुपरेषा ;

(दहा) प्रायोजक मंडळाच्या अधिपत्याखाली असणाऱ्या संबंधित कौशल्य क्षेत्रांतील अनुभवी व तज्ज्ञ व्यक्ती ;

(अकरा) देण्यात येणाऱ्या सुविधा, अभ्यासक्रम व संशोधन कार्य, हे सुरू करण्याचे प्रस्तावित केले असेल तर त्यांचे स्वरूप ;

(बारा) अभ्यासक्रमनिहाय किंवा उपक्रमनिहाय अंदाजित आवर्ती खर्च, वित्तीय स्त्रोत आणि प्रत्येक विद्यार्थ्यांवरील अंदाजित खर्च ;

(तेरा) साधनसंपत्तीचे एकत्रीकरण करण्याची योजना, त्यासाठी येणारा भांडवली खर्च आणि अशा साधनसंपत्तीच्या परतफेडीची रीत ;

(चौदा) विद्यार्थ्यांकडून वसूल केले जाणारे शुल्क, विद्यापीठाच्या उद्दिष्टांशी संबंधित असलेल्या सल्लाविषयक सेवांकडून आणि इतर उपक्रमांकडून अपेक्षित असलेला महसूल आणि अन्य अपेक्षित उत्पन्न यांच्यामार्फत अंतर्गतरीत्या निधी उभारण्यासाठी केलेली योजना ;

(पंधरा) विशेष तरतुदींद्वारे आणि यासंबंधातील सकारात्मक कृतींद्वारे राज्यातील रहिवासी असलेल्या समाजातील दुर्बल घटकांचा कौशल्य शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आधारभूत योजना ;

(सोळा) विद्यापीठातील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी अनुसरावयाची प्रस्तावित प्रणाली ;

(सतरा) स्थानिक गरजांच्या संबंधातील अध्ययनक्रमाचे स्वरुप आणि प्रस्तावित विद्यापीठाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विद्यापीठाने हाती घ्यावयाचे विशेषीकृत अध्यापन, प्रशिक्षण किंवा संशोधनविषयक उपक्रमांचे स्वरूप ;

(अठरा) विद्यापीठाने शेतकरी, शेतमजूर, इतर कामगार, महिला आणि उद्योग यांच्या लाभासाठी काही अध्ययनक्रम सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे किंवा कसे, असल्यास, त्याचा तपशील द्यावा ;

(एकोणीस) खेळ, क्रीडा आणि राष्ट्रीय छात्रसेना (एन.सी.सी.), राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.), इत्यादींसारख्या पाठ्येतर उपक्रमांसाठी उपलब्ध असलेली किंवा निर्माण करण्याचे प्रस्तावित केलेली क्रीडांगणे व इतर सुविधा यांचा तपशील ;

(वीस) विद्याविषयक मूल्यमापन करण्यासाठी प्रस्तावित केलेली व्यवस्था ;

(एकवीस) प्रस्तावित विद्यापीठ स्थापन करण्याच्या आवश्यकतेचे समर्थन ;

(बावीस) विनियामक मंडळाच्या मानकांचे पालन करण्याची बांधिलकी ;

(तेवीस) प्रायोजक मंडळास द्यावेसे वाटतील असे अन्य तपशील ;

(चोवीस) शासनाने काढलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे अन्य तपशील.

सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे व त्याची तपासणी करणे.

४. (१) प्रायोजक मंडळाकडून सविस्तर प्रकल्प अहवालासह (डीपीआर) कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्याचा प्रस्ताव अंतर्भूत असलेला अर्ज प्राप्त झाल्यावर, शासनाने आदेशाद्वारे घटित केलेली छाननी समिती, पुढील कारणांच्या आधारे प्रस्तावाची व सविस्तर प्रकल्प अहवालाची छाननी करील :—

(क) प्रायोजक मंडळाची आर्थिक सुस्थिती आणि मत्ता तसेच प्रस्तावित विद्यापीठाच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी त्याच्याकडे असलेली क्षमता ;

(ख) प्रायोजक मंडळाची पार्श्वभूमी, म्हणजेच कौशल्य शिक्षण क्षेत्रातील मंडळाची विशेष तज्ञता व अनुभव, त्याचा सर्वसाधारण लौकिक, इत्यादी आणि विनियामक मंडळाची मानके अनुसरण्याची त्याची बांधिलकी ;

(ग) विनियामक मंडळाच्या शैक्षणिक धोरणानुसार, प्रस्तावित केलेला शैक्षणिक कार्यक्रम, संशोधन व नवोपक्रम उपक्रम, अभ्यासक्रम तयार करणे याबाबत प्रायोजक मंडळाचे सामर्थ्य व क्षमता म्हणजेच, प्रस्तावित विद्यापीठाच्या उद्दिष्टांमध्ये निश्चित केल्यानुसार अध्ययनक्रमाच्या नाविन्यतेसह ; समकालीन गरजांनुसार मनुष्यबळ विकसित करण्याची शैक्षणिक कार्यक्रमांची सक्षमता ;

(घ) प्रस्ताव संबंधित विनियामक मंडळाने विनिर्दिष्ट केलेल्या कौशल्य शिक्षणाच्या मानकांशी अनुरुप आहे किंवा कसे ;

(ङ) या बाबतीत शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाच्या अनुरूप प्रस्ताव आहे किंवा कसे.

(२) प्रस्ताव व सविस्तर प्रकल्प अहवाल यांची छाननी करताना, छाननी समितीस, प्रायोजक मंडळाकडून, योग्य वाटेल अशी अन्य माहिती मागविता येईल.

(३) समिती, कोणत्याही असल्यास, सूचनांसह तिचा अहवाल, विचारार्थ शासनाला सादर करील.

इरादापत्र देणे आणि अनुपालन अहवाल.

५. (१) कलम ४ अन्वये घटित केलेल्या समितीचा अहवाल मिळाल्यानंतर जर विद्यापीठ स्थापन करणे उचित असल्याबाबत राज्य शासनाची खात्री पटली तर, त्यास प्रायोजक मंडळाला इरादापत्र देता येईल ; आणि पुढील बाबी करण्यास फर्मावता येईल :—

(एक) कलम १३ च्या तरतुदींनुसार दाननिधी स्थापन करणे ;

(दोन) शासनाने काढलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या मानकांनुसार किमान जागेची प्रायोजक मंडळाची मालकी व कब्जा दर्शविणारे हक्क विलेख सादर करणे ;

(तीन) विद्यापीठ अनुदान आयोग किंवा कायद्याद्वारे स्थापन केलेले अन्य कोणतेही विनियामक मंडळ विनिर्दिष्ट करील अशा इतर शर्तींची पूर्तता करणे आणि विहित करील अशी अन्य माहिती पुरविणे ;

(चार) जर यापूर्वी उपलब्ध करण्यात आले नसेल तर, शासनाने काढलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या मानकांनुसार प्रशासनिक प्रयोजनांसाठी आणि विद्याविषयक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी व्याप्तक्षेत्रावर बांधकाम करणे ;

(पाच) विनियामक मंडळाने निर्धारित केलेल्या मानकांनुसार विद्यापीठाने सुरू करावयाच्या प्रत्येक विभागात किंवा विद्याशाखेमध्ये आवश्यक सहायक कर्मचाऱ्यांसह प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि पुरेशा संख्येतील सहायक प्राध्यापक नियुक्त करण्याची हमी देणे ;

(सहा) विनियामक मंडळाने घालून दिलेल्या मानकाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या हितार्करिता चर्चासत्र, वादविवाद, स्पर्धा करणे, प्रश्नमंजूषा कार्यक्रमासारखे अभ्यासक्रमाला पूरक असे कार्यक्रम आणि खेळ, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.), राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.), इत्यादींसारखे पाठ्येतर कार्यक्रम हाती घेण्याची हमी देणे ;

(सात) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांसाठी भविष्यनिर्वाह निधी स्थापन करण्याची आणि त्यांच्यासाठी कल्याणकारी कार्यक्रम हाती घेण्याची हमी देणे ;

(आठ) विनियामक मंडळाकडून निर्धारित करण्यात येईल अशी किंवा याबाबतीत नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशी इतर माहिती पुरविणे आणि अशा पायाभूत सुविधा व इतर आवश्यकता यांच्या अशा शर्तींची पूर्तता करणे.

(२) प्रायोजक मंडळ, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आवश्यकतांची आणि शर्तींची पूर्तता करील आणि इरादापत्र दिल्याच्या दिनांकापासून एक वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीत अनुपालन अहवाल शासनाला सादर करील. शासनास, उक्त कालावधी, आदेशाद्वारे अपवादात्मक परिस्थितीत, त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल असे शुल्क प्रदान केल्यावर वाढविता येईल.

(३) प्रायोजक मंडळाकडून सादर केलेला अनुपालन अहवाल प्राप्त झाल्यावर, शासन, अनुपालन अहवालांची पडताळणी करण्यासाठी आदेशाद्वारे एक पडताळणी समिती नियुक्त करील.

(४) पडताळणी समिती, पोट-कलम (१) मध्ये निर्धारित केलेल्या आवश्यकतांची व शर्तींची प्रायोजक मंडळाने पूर्तता केली आहे किंवा कसे हे विनिर्दिष्ट करणारा तिचा अहवाल तिच्या नियुक्तीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत शासनाला सादर करील. शासनाला, पडताळणी समितीने अहवाल सादर करण्याचा कालावधी, जास्तीत जास्त तीन महिन्यांपर्यंत वाढविता येईल.

(५) जर प्रायोजक मंडळाने, पोट-कलम (१) च्या तरतुदीचे पालन करण्यात कसूर केली तर, कलम ३ अन्वये प्रायोजक मंडळाने सादर केलेला प्रस्ताव, फेटाळण्यात येईल आणि पोट-कलम (१) अन्वये दिलेले इरादापत्र काढून घेण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

विद्यापीठाची स्थापना व विधिसंस्थापन.

६. (१) शासन, कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, प्रायोजक मंडळाने कलम ५ मधील तरतुदींचे अनुपालन केले आहे, याबाबत खात्री पटली असेल तर, खाजगी कौशल्य विद्यापीठाचे व त्याच्या प्रायोजक मंडळाचे नाव, ठिकाण व मुख्यालय, कायदा अधिनियमित करून केलेल्या सुधारणेद्वारे अनुसूचीच्या भाग दोनमध्ये समाविष्ट करून, खाजगी कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी देईल.

(२) अध्यक्ष, कुलगुरू आणि नियामक मंडळ, व्यवस्थापन मंडळ व विद्यापरिषद यांचे सदस्य आणि यानंतर ज्या व्यक्ती, असे अधिकारी किंवा सदस्य होतील अशा सर्व व्यक्ती, जोपर्यंत त्या असे पद किंवा सदस्यत्व धारण करीत राहतील तोपर्यंत त्या व्यक्ती, याद्वारे, अनुसूचीमध्ये त्यांच्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या नावाचा एक निगम निकाय म्हणून घटित व घोषित करण्यात येत आहे.

(३) अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या विद्यापीठांची अखंड परंपरा व सामाईक मोहोर असेल आणि त्यास किंवा त्याच्याविरुद्ध त्याच नावाने दावा दाखल करता येईल.

(४) अनुसूचीच्या भाग एकच्या अनुक्रमे, स्तंभ (२) व स्तंभ (४) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विद्यमान प्रत्येक विद्यापीठाच्या व त्याच्या प्रायोजक मंडळाच्या संबंधात, उक्त भागाच्या स्तंभ (३) मध्ये त्यांच्या समोर विनिर्दिष्ट केलेले नाव, ठिकाण व मुख्यालये असलेले तत्सम विद्यापीठ, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी ज्या उद्दिष्टांसाठी घटित केले होते त्या उद्दिष्टांसाठी, या अधिनियमाअन्वये स्थापन झाले असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमाच्या तरतुदी, अशा विद्यापीठास लागू असतील.

(५) विद्यापीठ, या अधिनियमान्वये स्थापन केलेले असंलग्न एकात्म विद्यापीठ म्हणून कार्य करील आणि त्यात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी किंवा बहाल करण्यासाठी इतर कोणत्याही महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला संलग्न असणार नाही.

(६) प्रत्येक विद्यापीठाने सातत्यपूर्ण अंतर्गत हमी प्रक्रिया आणि नियतकालिके बाह्य सूक्ष्म पुनरिक्षण करण्याकरिता राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने (नॅक) आवश्यक केल्याप्रमाणे एक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष स्थापन करील. गुणवत्ता अहवाल शासनाला सादर करण्यात येतील.

सचिवस्तरीय समिती.

७. (१) विद्यापीठाच्या स्थापनेनंतर, प्रायोजक मंडळ, त्याने सादर केलेल्या हमींचे आणि इरादापत्रामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विद्यापीठाच्या कार्यान्वयनाशी संबंधित असणाऱ्या शर्तींचे आणि या अधिनियमाच्या तरतुदींचे व त्याखाली केलेल्या नियमांचे अनुपालन करीत आहे किंवा कसे याची पडताळणी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, वित्त विभाग आणि नियोजन विभाग यांचा समावेश असलेली एक सचिव स्तरीय समिती करील.

(२) पोट-कलम (१) खालील घटीत केलेली समिती, तिचा अहवाल शासनाला सादर करील.

(३) पोट-कलम (२) खालील अहवाल प्राप्त झाल्यावर, राज्य शासन, विद्यापीठाच्या कार्यान्वयनास परवानगी देणारी अधिसूचना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करील.

(४) विद्यापीठ, पोट-कलम (३) अन्वये अधिसूचना काढल्यानंतरच केवळ विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

सचिव स्तरीय समितीद्वारे निरीक्षण.

८. सचिव स्तरीय समितीस, शासनाने निदेश दिलेले असतील तेव्हा व तसे, विद्यापीठाचे निरीक्षण करता येईल आणि स्वयं-अर्थसहाय्यित कौशल्य विद्यापीठांच्या आस्थापनेशी संबंधित असणाऱ्या शर्तींचे अनुपालन केल्याची आणि अशी समिती, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या संबंधित कायद्यांच्या तरतुदींचे अनुपालन केल्याची पडताळणी व सुनिश्चिती देखील करील.

विद्यापीठाची उद्दिष्टे.

९. (१) विद्यापीठाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील :—

(क) विविध स्तरावर कौशल्य निपुणता आणि सक्षमता यांसह अर्हताप्राप्त युवक तयार करणे ;

(ख) ज्या क्षेत्रामध्ये भविष्यात नोकऱ्या निर्माण होणार आहेत अशा, स्वयंचलित, वस्त्र प्रावरणे व फर्निशिंग, विमानचालन, व अंतरिक्षयान, प्रसार माध्यम व मनोरंजन, चित्रपट, भांडवली वस्तू, दळणवळण,

संकल्पचित्रण, तंत्रज्ञान, व्यवस्थापन व उद्योजकता, व्यवसाय, बँकींग व विमा आरोग्य सेवा, आदरातिथ्य, मालवाहतूक, क्रीडा, प्रवास व पर्यटन, जीवनशास्त्रे, उपयोजित व सृजनशील कला, मानव्यविद्या, विदा शास्त्र व कृत्रिम बुद्धिमत्ता, इ-व्यवसाय, किरकोळ विक्री, विश्लेषण, कृषी व्यवसायाशी संबंधित उद्योग ४.०, राष्ट्रीय उच्च शिक्षण अर्हता आराखडा (एन.एच.ई.क्यू.एफ) कौशल्य आधारित पाठ्यक्रम संबंधित आणि रोजगारक्षमता असलेलं कौशल्य शिक्षण देण्यासह अन्य कोणतीही अभ्यास क्षेत्रे यांसारख्या अन्य कोणत्याही क्षेत्रामध्ये वेळोवेळी संबंधित असतील असे, विस्तृत ज्ञान क्षेत्र व विशेषज्ञता यांचा समावेश असलेले अध्ययन, अध्यापन, क्षमता, योग्यता आणि कौशल्य विकास व उद्योजकता विषयक प्रशिक्षण देणे ;

(ग) विकास व सामाजिक पुनर्रचना आणि परिवर्तन यांचे नवीन मार्ग शोधण्यासाठी सर्जनशीलता, अभिनव उपक्रम आणि उद्यमशीलता यांना चालना देण्यासाठी नवनवीन शैक्षणिक कार्यक्रम निर्माण करणे आणि त्यांचा जास्तीतजास्त चांगला वापर करणे ;

(घ) आवश्यक कौशल्य आणि सहाय्य देऊन उद्योजक व उद्योजकता निर्माण करणे ;

(ङ) क्षमताधिष्ठित कौशल्य शिक्षणासाठी श्रेयांक आराखडा तयार करणे ;

(च) शिक्षण, कौशल्य, प्रशिक्षण व उद्योजकता विकास यांकरिता अत्याधुनिक सुविधा स्थापन करणे ;

(छ) अध्यापन, कौशल्य निर्मिती व संशोधन करणे आणि सातत्याने दर्जेदार शैक्षणिक कार्यक्रम करणे ;

(ज) नाविन्यपूर्ण दृष्टीकोनासह नवीन व नव्याने उदयास येणाऱ्या क्षेत्रांतील रोजगार व उद्योजकता हे ध्येय असलेले कौशल्य विकास कार्यक्रम, पाठ्यक्रम सुरू करणे ;

(झ) परीक्षाधिष्ठित किंवा मूल्यमापनाच्या इतर कोणत्याही पद्धतींवर आधारित असलेल्या पदव्या, पदव्युत्तर पदवी, विद्यावाचस्पती पदवी, संशोधन पदवी, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाध्या सुरू करणे ;

(ञ) ऑनलाईन श्रेयांक पाठ्यक्रमांसह, पाठ्यक्रमांना पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती देणे ;

(ट) लाभदायक रोजगार, उद्योजकता, नोकरीकालीन प्रशिक्षण व शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण देणाऱ्या विविध कार्यक्रमांद्वारे उच्च व्यावसायिक कौशल्य विकास व प्रशिक्षण देणे ;

(ठ) भारतातील व परदेशातील इतर संस्थांशी, उद्योगांशी व उद्योग संघांशी संबंध, सहयोग आणि भागीदारी प्रस्थापित करणे ;

(ड) सर्जनशीलता व उद्यमशीलता विकसित करण्यासाठी आणि त्यांची अभिवृद्धी करण्यासाठी विद्याविषयक संरचना, अध्ययन कालावधी आणि कार्यरत व निरंतर मूल्यमापन प्रक्रिया यांमध्ये एकसंधता निर्माण करण्याकरिता अभिनव दृष्टिकोन प्रस्थापित करणे ;

(ढ) अत्याधुनिक माहिती दळणवळण तंत्राचा वापर करून दुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण, प्रशिक्षण व अध्ययन संसाधने पोहोचविण्याचे ध्येय ठेवणे ;

(ण) विविध प्रकारच्या शिक्षण व अध्ययन पद्धती एकत्रित करून त्याद्वारे अध्यापन-अध्ययन पद्धतींची आणि (संमिश्र किंवा दूरस्थ किंवा ऑनलाइन किंवा कौशल्यपूर्ण किंवा इतर माध्यमातून) तिच्या सादरीकरणाची तरतूद करणे आणि जेथे विकास व प्रगती करण्यासाठी विद्यार्थी विद्याशाखेतील व उद्योग क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींबरोबर एकत्र येतील अशा एका "आभासी परिसराची" तरतूद करणे ;

(त) वेगवेगळी पार्श्वभूमी, वयोगट व सामाजिक-आर्थिक स्थिती आणि भौगोलिक स्थान यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यापक प्रमाणातील अध्ययनार्थींना, स्वतःच्या गतीने, स्वतःच्या शैलीने, प्रत्यक्षपणे किंवा ऑनलाईन अध्ययन वातावरणातून अध्ययनाच्या संधी देणे ;

(थ) सक्षम प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीने कौशल्य शिक्षणातील संमिश्र किंवा दूरस्थ किंवा ऑनलाईन पदव्या प्रदान करणे ;

(द) विद्यार्थी, प्राध्यापक सदस्य व इतर यांच्याकरिता विशिष्ट शिक्षण व संशोधन कार्यक्रम, प्रशिक्षण कार्यक्रम, कौशल्य व आदानप्रदान कार्यक्रम यांचे संकल्पन, संकल्पचित्रण, विकास करण्यासाठी आणि ते देण्यासाठी इतर महाविद्यालये, विद्यापीठे, संशोधन संस्था, नफा किंवा ना-नफा संस्था, महामंडळे, उद्योग, उद्योग संघ, व्यावसायिक संघ किंवा भारतातील किंवा परदेशातील इतर संघटना यांच्यासोबत सहयोग करणे ;

(ध) बाजारातील गरजांनुसार अनुभवाधिष्ठित प्रशिक्षण, व्यावसायिक व कौशल्य आधारित प्रशिक्षण यांवर भर दिलेल्या अध्यापन, अध्ययन-अध्यापनशास्त्राची तरतूद करणे ;

(न) उदयोन्मुख प्रवाह समजून घेण्याच्या दृष्टीने, कामगार क्षेत्रातील आवश्यकतांमधील संशोधन हाती घेणे आणि यथोचित अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व कार्यक्रम सुरू करणे ;

(प) रोजगार व उद्योजकता यासाठी शिक्षण, संशोधन, प्रशिक्षण व कौशल्य विकास यांच्या नाविन्यपूर्ण प्रतिमानांना प्रोत्साहन देण्यासाठी, भारतातील व परदेशातील कोणत्याही संघटनांसोबत परस्पर सहयोगाने संशोधन हाती घेणे आणि त्याचा पुरस्कार करणे ;

(फ) शिक्षक, प्रशासक व कार्यरत व्यावसायिक यांच्यासाठी उच्च गुणवत्ता प्रशिक्षण, क्षमता बांधणी व विकास पद्धती संकल्पचित्रित करणे व देणे ;

(ब) संयुक्त कार्यक्रम किंवा पाठ्यक्रम किंवा संशोधन करण्यासाठी किंवा विद्याशाखा किंवा माहिती यांचे आदानप्रदान करण्यासाठी किंवा पद्धतींची देवाण-घेवाण करण्यासाठी आणि साधनसामग्री किंवा संसाधने किंवा अनुदाने देण्यासाठी किंवा मिळविण्यासाठी अथवा विद्यार्थ्यांच्या लाभासाठी सल्ला देण्यासाठी भारतातील इतर राज्यांमधील किंवा परकीय देशांमधील लौकिकप्राप्त संस्था, उद्योग, व्यवसाय, विद्यापीठे किंवा प्रयोगशाळा किंवा अभिकरणे किंवा संघटना यांच्याशी सहयोग करणे ;

(भ) पूर्व अध्ययन, कौशल्य वाढ व पुनर्कौशल्य यांना मान्यता देण्याकरिता यंत्रणा व सुविधा देणे ;

(म) बहुविध-प्रवेश घेण्याचे किंवा बाहेर पडण्याचे पर्याय निर्माण करण्यासाठी आणि विद्यापीठांमधील किंवा त्याच्या प्रांतातील किंवा क्षेत्रांतील चलनशीलतेच्या संधी देण्यासाठी क्रेडिट बँकिंग किंवा हस्तांतरण प्रणाली निर्माण करण्याची यंत्रणा व सुविधा देणे ;

(य) परंपरागत किंवा संमिश्र किंवा दूरस्थ किंवा ऑनलाईन शिक्षण आणि वेगवेगळ्या अध्यापनशास्त्रीय दृष्टिकोनांशी व पद्धतींशी अनुरूप शिक्षण देणारी इतर प्रतिमाने यांमार्फत विद्यापीठीय पाठ्यक्रमांतून विद्यार्थ्यांना आजीवन व सातत्यपूर्ण प्रशिक्षणाची संधी देणे ;

(यक) उत्पादकता निर्माण करण्यासाठी अनौपचारिक क्षेत्र व असंघटित कामगार याना शिक्षण, प्रशिक्षण व कौशल्य विकासाच्या संधी पुरविणे ;

(यख) लवचिक व रचनात्मक अध्ययन मार्गांची तरतूद करून त्याद्वारे बहुविध-प्रवेश घेण्याचे व बाहेर पडण्याचे पर्याय उपलब्ध करून देणे ;

(यग) तांत्रिक, व्यावसायिक व कौशल्य आधारित शिक्षण व प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना, उच्च विकसित क्षेत्रांतील पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी व डॉक्टरेट कार्यक्रम देऊन आणि लाभदायी रोजगार यादृष्टीने युवकांना तयार करण्यासाठी विविध विशेषज्ञता देऊन, उर्ध्वगामी गतिशीलता देणे ;

(यघ) अध्ययनाच्या लवचिक व मुक्त व्यवस्थेची तरतूद करणे ;

(यङ) व्यावसायिक शिक्षण व कौशल्य प्रशिक्षण देण्यात सहभागी झालेले प्राध्यापक व प्रशिक्षक यांच्याकरिता अध्यापनशास्त्रीय व कौशल्यवर्धक प्रशिक्षण व विकास कार्यक्रम आयोजित करणे ;

(यच) उद्योग, संघटना, अभिकरणे व सर्व समाज यांना मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक व विकास सेवा पुरविणे ;

(यछ) विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता तसेच, इतर विद्यार्थी, अभिकरणे, प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, परिसंस्था, उद्योग व संघटना यांचे कौशल्यनिर्धारण प्रमाणन हाती घेणे ; अध्यापक, प्रशिक्षक, अभिकरणे, परिसंस्था व संघटना यांचे कौशल्यनिर्धारण करून त्यांच्याकरिता प्रशिक्षण आयोजित करणे ; कौशल्यनिर्धारण, ऑनलाइन निर्धारण, संगणकीकृत निर्धारण किंवा चाचणी पद्धतीचे संशोधन करणे आणि निर्धारण किंवा चाचण्या घेण्यासाठी आवश्यक असलेले सॉफ्टवेअर, हार्डवेअर उपाय किंवा इतर पद्धती किंवा प्रक्रिया विकसित करणे ;

(यज) एकविसाव्या शतकातील व्यक्तींसाठी व समाजासाठी अध्ययन, अध्यापन, संशोधन, मूल्यमापन, विकसन, संघटन आणि सामाजिक आर्थिक संपत्तीची निर्मिती यांचे नियमन व व्यवस्थापन करण्यासाठी आधुनिक व आधुनिकोत्तर प्रक्रिया, यंत्रणा व तंत्रज्ञान यांचा वापर करणे ;

(यझ) अभिनव प्रयोगशाळा, सेवांतर्गत प्रशिक्षण केंद्र, कार्यशाळा यांची स्थापना करून त्यामार्फत उद्योग व उद्योग संघ यांच्या सहभागास आणि नियमन, अभ्यासक्रम निर्मिती, कौशल्य प्रशिक्षण, पदस्थापना, आंतरवासिता, सल्ला, संयुक्त-प्रकल्प, इत्यादींसारख्या सर्व घटकांमधील सक्रिय सहभागाला प्रोत्साहन देणे ;

(यञ) स्थापनेपासून पाच वर्षांनंतर सक्षम विनियामक मंडळाच्या परवानगीने, विद्यार्थी सेवा देणे आणि शिक्षणाचा प्रसार करणे, सल्ला देणे, माहिती व कौशल्य प्रशिक्षण देणे सुलभ होण्यासाठी राज्यातील व राज्याबाहेरील आणि देशातील व देशाबाहेरील विविध ठिकाणी परिसर, कौशल्य केंद्रे, समूह महाविद्यालये, अभ्यास केंद्रे, माहिती केंद्रे, चाचणी किंवा परीक्षा केंद्रे, उत्कृष्टता केंद्रे, विस्तारित विद्यापीठ परिसर केंद्रे व परदेशस्थित विद्यापीठ परिसर केंद्रे, इत्यादींची स्थापना करणे ;

(यट) शिक्षण, कौशल्य रोजगार व उद्यमशीलताविषयक गरजा समजून घेण्याच्या आणि त्यानुसार कार्यक्रम देण्याच्या दृष्टीने विविध मंत्रालये, राज्य संस्था, विभाग, अभिकरणे किंवा राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील इतर सांविधिक संस्था यांच्यासोबत संपर्क ठेवणे किंवा सहयोग करणे ;

(यठ) अभ्यासक्रम विकास, शिक्षक प्रशिक्षण, प्रात्यक्षिक, संशोधन, नोकरीकालीन प्रशिक्षण, कौशल्य मूल्यनिर्धारण प्रमाणने, इत्यादींमध्ये सहभागी होण्याकरिता उद्योगांशी सुसंवाद साधणे ;

(यड) विद्यापीठाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि त्यांना चालना देण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असेल अशी कारवाई हाती घेणे ;

(यढ) विद्यापीठाने प्रदान केलेल्या पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर शैक्षणिक विशेषोपाध्या यांचा दर्जा, सक्षम विनियामक मंडळाने निर्धारित केलेल्या दर्जापेक्षा कमी असणार नाहीत याची सुनिश्चिती करणे ;

(यण) शासनाद्वारे सुचविण्यात येतील अशा अन्य कोणत्याही उद्दिष्टांचा पाठपुरावा करणे.

(२) शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विद्यापीठाची विशेष उद्दिष्टे अधिसूचित करील.

(३) पोट-कलम (२) अन्वये काढलेली अधिसूचना, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल.

विद्यापीठाचे अधिकार व कार्ये.

१०. विद्यापीठाचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) ऑनलाइन शिक्षण पद्धतीसह पारंपरिक तसेच नाविन्यपूर्ण पद्धती यांमार्फत पाठ्यक्रमासंबंधातील अध्ययन, अध्यापन व संशोधन यांच्याबाबतीत तरतुदी करणे व सर्व उपाययोजना (अभ्यासक्रम स्वीकारणे व अद्ययावत करणे यांसह) स्वीकृत करणे ;

(दोन) विद्यापीठाद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे विविध पातळ्यांकरिता अभ्यासक्रम संच व श्रेयांक आराखडे विकसित करणे ;

(तीन) विद्यापीठाला योग्य वाटेल त्याप्रमाणे, वेळोवेळी काढण्यात आलेल्या, विद्यापीठ अनुदान आयोगाने काढलेल्या कौशल्याधारित श्रेयांक आराखड्याशी व राष्ट्रीय श्रेयांक आराखड्याशी सुसंगत असलेली कौशल्य शिक्षण, अध्यापन व शिक्षण यांची मानके व मापदंड निश्चित करणे ;

(चार) संबंधित पदवी अध्ययनक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्याच्या आणि बहुविध मूल्यमापन पद्धतींद्वारे मूल्यांकन केलेल्या शैक्षणिक कार्यासाठी मिळविलेल्या श्रेयांकांच्या आधारे पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर शैक्षणिक विशेषोपाध्या सुरू करणे ;

(पाच) परीक्षा आयोजित करणे व घेणे ;

(सहा) अध्ययनक्रमांमध्ये नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांचा अध्ययनक्रम पूर्ण केल्याची आणि शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण व नोकरीकालीन प्रशिक्षण यांसह लक्ष्य साध्य केल्याची सुनिश्चिती करण्यासाठी आवश्यक ती कारवाई करणे ;

(सात) इतर मान्यताप्राप्त विद्यापीठे, मंडळे किंवा परिषदा यांच्या पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे यांच्याशी समतुल्य किंवा तत्सम अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे देणे ;

(आठ) ऑनलाईन श्रेयांक पाठ्यक्रमांसह पसंतीवर आधारित श्रेयांकपद्धती पाठ्यक्रम देणे ;

(नऊ) लाभदायक रोजगार, उपक्रमशीलता, नोकरीकालीन प्रशिक्षण व शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण यांसारख्या विविध अध्ययनक्रमांद्वारे उच्च व्यावसायिक कौशल्य विकास करणे व प्रशिक्षण देणे ;

(दहा) सांविधिक संस्थांनी वेळोवेळी मान्यता दिल्याप्रमाणे कोणताही विद्याविषयक अध्ययनक्रम प्रस्तुत करणे ;

(अकरा) विद्यापीठ परिसर क्षेत्र उभारण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना हाती घेणे ;

(बारा) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, मानद पदव्या सुरू करणे व त्या प्रदान करणे ;

(तेरा) विनिर्दिष्ट करण्यात येतील त्याप्रमाणे, अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या, छात्रवृत्त्या सुरू करणे व देणे ;

(चौदा) समाजातील शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांमध्ये शिक्षणविषयक सुविधांचा प्रचार करण्यासाठी विशेष उपाययोजना करणे ;

(पंधरा) तांत्रिक, प्रशासकीय व इतर आवश्यक पदे निर्माण करणे व त्यांवर नियुक्त्या करणे ;

(सोळा) परस्पर मान्य होतील अशा अटी व शर्तींवर संशोधन प्रकल्प हाती घेणे ;

(सतरा) संमंत्रक सेवा पुरविणे ;

(अठरा) या अधिनियमाच्या तरतुदींना अनुसरून विद्यापीठाची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी परिनियम, आदेश व विनियम तयार करणे ;

(एकोणीस) विद्यापीठाचे अध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी अभ्यासानुवर्ती उपक्रमांना प्रोत्साहन देणे व त्यांचे प्रचालन करणे ;

(वीस) सक्षम विनियामक मंडळाच्या अनुदेशांनुसार देशांतर्गत व देशाबाहेरील इतर विद्यापीठांच्या सापेक्ष प्रतियोगी तत्त्वावर दुहेरी पदव्या, पदविका किंवा प्रमाणपत्रे देण्याची तरतूद करणे ;

(एकवीस) विद्यापीठाच्या विविध ज्ञानशाखांच्या एकात्मीकृत पाठ्यक्रमांसाठी अशा तरतुदी करणे ;

(बावीस) राज्य शासन, केंद्र सरकार व सक्षम विनियामक मंडळ यांनी दिलेल्या अनुदेशांनुसार वेळोवेळी केंद्रे, महाविद्यालये, परिसंस्था, विस्तारित विद्यापीठ परिसर केंद्रे, परदेशस्थित विद्यापीठ परिसर केंद्रे, अभ्यास केंद्रे, कौशल्य केंद्रे, परीक्षा केंद्रे, उत्कृष्टता केंद्रे व उपकेंद्रे उभारणे ;

(तेवीस) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे प्रचलित नियम व विनियम यांच्या संदर्भात विद्यापीठाच्या प्रयोजनासाठी व उद्दिष्टांसाठी देणग्या, दान व अनुदाने स्वीकारणे आणि राज्यामधील किंवा बाहेरील, न्यास किंवा दाननिधी मालमत्ता यांसह कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता संपादित करणे, ती धारण करणे, तिची व्यवस्था पाहणे आणि तिचा विनियोग करणे आणि निधीची गुंतवणूक करणे ;

(चोवीस) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार, विविध अध्ययनक्रमांसाठी किंवा पाठ्यक्रमांसाठी वेळोवेळी शुल्काची संरचना विहित करणे ;

(पंचवीस) वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल त्यानुसार अशा शुल्कांची व इतर आकारांची मागणी करणे व त्यांच्या रकमा स्वीकारणे ;

(सव्वीस) परस्पर मान्य होतील अशा अटी व शर्तींवर, इतर परिसंस्था, उद्योग, औद्योगिक संघटना यांच्याशी सहयोग करणे ;

(सत्तावीस) सक्षम विनियामक मंडळे यांनी विनिर्दिष्ट केलेल्या मानकांना अनुसरून विद्यापीठाच्या अध्यापकांचे व कर्मचाऱ्यांचे वेतन, पारिश्रमिक, मानधन निश्चित करणे ;

(अठ्ठावीस) बहिःशाल अध्यापन व विस्तारित सेवा आयोजित करणे व उपक्रम हाती घेणे ;

(एकोणतीस) विद्यापीठाचे विद्यार्थी व कर्मचारी यांच्या शिस्तीचे विनियमन करणे व ती अंमलात आणणे आणि आवश्यक वाटतील असे शिस्तविषयक उपाय योजणे ;

(तीस) विद्यापीठाचे विद्यार्थी व कर्मचारी यांच्या आरोग्यास व सर्वसाधारण कल्याणास चालना देण्याची व्यवस्था करणे ;

(एकतीस) वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तींवर, मान्य असतील अशी प्रयोजने साध्य करण्यासाठी, अशा प्रयोजनांना चालना देण्याच्या दृष्टीने व विद्यापीठाच्या उद्दिष्टांप्रमाणेच समान उद्दिष्टे असलेल्या, देशातील व देशाबाहेरील इतर कोणत्याही विद्यापीठाला, प्राधिकरणाला किंवा कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी संस्थाना सहकार्य करणे ;

(बत्तीस) विद्यापीठाकडून प्रकाशित करण्यात येतील अशा पाठ्यपुस्तकांसह संशोधन व इतर कार्यांच्या मुद्रणाची, पुनर्मुद्रणाची व प्रकाशनाची तरतूद करणे ;

(तेहतीस) विद्यापीठाचे वरील अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांच्या संदर्भात, राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशांचे अनुपालन करणे व ते अंमलात आणणे ;

(चौतीस) अध्ययनक्रम संरचना, अभ्यासक्रम, श्रेयांक पद्धती, अध्यापन-अध्ययन पद्धती, मूल्यमापन अध्यापनशास्त्र यांच्या रूपरेषेबद्दल तरतुदी करणे आणि उद्योगांच्या आवश्यकतेनुसार विद्यापीठाने प्रस्तुत केलेल्या अध्ययनक्रमांच्या संबंधात अभ्यास, अध्यापन व संशोधन करण्याच्या बाबतीत सर्व उपाययोजना करणे ;

(पस्तीस) अध्यापन संवर्गांसाठी आणि प्रशिक्षणासाठी नियुक्त करावयाचे अध्यापक, कर्मचारीवर्ग व उद्योगतज्ज्ञ किंवा विशेषतज्ज्ञ यांच्या किमान अर्हतेचे निकष विहित करणे ;

(छत्तीस) नोकरीकालीन प्रशिक्षण व इतर संबंधित उपक्रमांच्या बाबतीत, उद्योगाधारित कौशल्य निर्धारण, उद्योगाधारित प्रकल्प, अंतर्वासिता यांच्या रूपरेषेसहित मूल्यमापन पद्धती विहित करणे ;

(सदतीस) विद्यार्थ्यांना बहुविध प्रवेश घेण्याची व बाहेर पडण्याची आणि श्रेयांक संचयन करण्याची व हस्तांतरण करण्याची सुविधा पुरवून, कौशल्य विकास अध्यापनशास्त्रानुरूप पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती सुरू करणे ;

(अडतीस) विद्यार्थी व नोकरी करणाऱ्या व्यावसायींना प्रमाणपत्र, पदविका व पदवी अध्ययनक्रम प्रस्तुत करण्यासाठी दूरस्थ व ऑनलाईन अध्ययन आणि निरंतर शिक्षण विभाग स्थापन करणे ;

(एकोणचाळीस) सक्षम प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीने कौशल्य शिक्षणातील संमिश्र किंवा ऑनलाईन पदव्या प्रदान करणे ;

(चाळीस) विद्यार्थी व उद्योग यांच्या गरजेनुसार ऑनलाईन शिक्षण अध्ययनक्रम सुरू करणे ;

(एकेचाळीस) विद्यापीठाला त्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योग्य वाटेल त्याप्रमाणे जी आवश्यक किंवा सोयीस्कर असेल अशी कोणतीही जमीन किंवा इमारत, परिवास्तू किंवा पायाभूत सुविधा खरेदी करणे किंवा भाडेपट्ट्याने घेणे किंवा लिव्ह ॲन्ड लायसन तत्त्वावर घेणे ;

(बेचाळीस) विद्यापीठाकडून प्रस्तुत करण्यात येणाऱ्या ऑनलाईन शिक्षण अध्ययनक्रमांसाठी अनेक प्रवेश फेऱ्या आयोजित करणे ;

(त्रेचाळीस) बहुविध प्रवेश घेण्यासाठी व बाहेर पडण्यासाठी, पूर्व अध्ययनास मान्यता देण्यासाठी, श्रेयांक संचय व हस्तांतरण करण्यासाठी, श्रेयांक अधित्यजन करण्यासाठी, उर्ध्वगामी व पार्श्विक गतिशीलतेसाठी योजना आणि मोठ्या प्रमाणात कौशल्य विकासाला चालना देईल अशी इतर कोणतीही योजना सुरू करणे ;

(चव्वेचाळीस) विद्यार्थ्यांना समतुल्यता प्रमाणपत्रे देणे, विषयातून सूट देणे, विषय जोडणे, कौशल्यमापन प्रमाणपत्र देणे, लवचिक अध्ययन विषय प्रस्तुत करणे, इत्यादींची तरतूद करण्यासाठी पूर्व-अध्ययन मान्यता विभाग स्थापन करणे ;

(पंचेचाळीस) विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच, त्रयस्थ पक्षाकडून मूल्यनिर्धारण करून घेण्यास इच्छुक असलेले इतर विद्यार्थी, अभिकरणे, प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, उद्योग व संघटना यांच्यासाठी कौशल्य निर्धारण हाती घेणे ;

(सेहेचाळीस) रोजगाराच्या संधी व नोकरीच्या गरजा जाणून घेण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना व्यवसाय समुपदेशनाद्वारे आपल्या आवडीचा व्यवसाय निवडण्यास मदत करण्यासाठी स्थानिक उद्योगांशी विचारविनिमय करून व्यवसाय व रोजगार मार्गदर्शन कक्ष स्थापन करणे ;

(सत्तेचाळीस) युवकांना व्यवसाय मार्गदर्शन करणे आणि समुपदेशन करणे ;

(अठ्ठेचाळीस) मध्यवर्ती ग्रंथालय, विभागीय ग्रंथालये, संग्रहालये व संलग्न बाबी उभारणे ;

(एकोणपन्नास) क्रीडा व इतर पाठ्येतर उपक्रमांना उत्तेजन देणे व चालना देणे ;

(पन्नास) सभागृहे व वसतिगृहे स्थापन करणे व त्यांचे परिरक्षण करणे ;

(एकावन्न) विद्यार्थ्यांच्या निवासासाठी विद्यापीठांकडून चालवल्या न जाणाऱ्या सभागृहांना व वसतिगृहांना मान्यता देणे, त्यांचे पर्यवेक्षण व नियंत्रण करणे आणि अशी कोणतीही मान्यता काढून घेणे ;

(बावन्न) विद्यापीठ अनुदान आयोग (खाजगी विद्यापीठांची स्थापना करणे व दर्जा राखणे) विनियम, २००३ याच्या तरतुदींचे किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाने केलेले इतर कोणतेही विनियम किंवा दिलेले निदेश यांचे वेळोवेळी अनुपालन व अनुसरण करणे ;

(त्रेपन्न) विद्यापीठाची सर्व किंवा त्यापैकी कोणतीही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक, आनुषंगिक किंवा हितावह असतील अशा सर्व गोष्टी करणे.

विद्यापीठ सर्वांसाठी खुले असणे.

११. (१) भारताच्या कोणत्याही नागरिकास लिंग भेद, वंश, पंथ, वर्ग, जात, जन्मस्थान, राष्ट्रीयत्व, धर्मश्रद्धा किंवा व्यवसाय किंवा राजकीय किंवा इतर मतप्रणाली केवळ याच कारणावरून, विद्यापीठाच्या कोणत्याही पदापासून किंवा त्यांच्या प्राधिकरणांपैकी, मंडळांपैकी किंवा समित्यांपैकी, कोणत्याही प्राधिकरणाचे, मंडळाचे किंवा समितीचे सदस्यत्व मिळण्यापासून किंवा कोणत्याही पदावरील नेमणुकीपासून किंवा कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी किंवा अभ्यास पाठ्यक्रम यासाठी प्रवेश मिळवण्यापासून वगळण्यात येणार नाही.

(२) विद्यापीठ, विद्यापीठ विभाग आणि विद्यापीठाच्या परिसंस्था यांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या प्रयोजनासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, दिव्यांग व्यक्ती व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक इत्यादींच्या आरक्षणाच्या संबंधात शासनाच्या धोरणाचा आणि वेळोवेळी काढलेल्या आदेशांचा विद्यापीठ अवलंब करील.

(३) विद्यापीठ, राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार समाजातील दुर्बल घटकांतील व अल्पसंख्याक वर्गातील विविध प्रवर्गांच्या कल्याणासंबंधात राज्य शासनाच्या सर्वसाधारण धोरणाचा अवलंब करील.

विद्यापीठ स्वयं-अर्थसहाय्यित असणे.

१२. या अधिनियमान्वये स्थापन केलेले प्रत्येक विद्यापीठ हे, स्वयं-अर्थसहाय्यित असेल. विद्यापीठ, शासनाकडून कोणत्याही स्वरूपाचे इतर वित्तीय सहाय्य मिळण्यास हक्कदार असणार नाही आणि विद्यापीठात प्रवेश घेतलेला कोणताही विद्यार्थी, कोणत्याही प्रकारच्या वित्तीय सहाय्यासाठी किंवा शिष्यवृत्तीसाठी किंवा शुल्काच्या प्रतिपूर्तीसाठी राज्य शासनाकडे मागणी करण्यास हक्कदार असणार नाही.

दाननिधी.

१३. (१) प्रायोजक मंडळ, शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा रकमेसह "विद्यापीठाचा दाननिधी" म्हणून संबोधण्यात येणारा एक स्थायी संविधानिक निधी स्थापन करील.

(२) या अधिनियमाच्या तरतुदींचे आणि त्याखाली केलेले नियम, परिनियम किंवा आदेश यांचे पालन करीत असल्याची सुनिश्चिती करण्यासाठी प्रतिभूती ठेव म्हणून दाननिधीचा वापर करील.

(३) विद्यापीठाने किंवा प्रायोजक मंडळाने या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे आणि त्याखाली केलेले नियम, परिनियम, आदेश किंवा विनियम यांचे उल्लंघन केल्यास, शासनास, संपूर्ण दाननिधी किंवा त्याचा काही भाग, विहित रीतीने सरकारजमा करण्याचा अधिकार असेल.

(४) दाननिधीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वापर, विद्यापीठाच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी करण्यात येईल, परंतु विद्यापीठाचा आवर्ती खर्च भागविण्यासाठी त्याचा वापर करण्यात येणार नाही.

(५) विद्यापीठाचे विसर्जन होईपर्यंत, दाननिधीची रक्कम, अशा प्रकारे निधीतून गुंतविलेल्या रकमा, शासनाच्या परवानगीशिवाय काढण्यात येणार नाही या शर्तीस अधीन राहून, संयुक्त धारक म्हणून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालकाकडून राष्ट्रीयीकृत बँकेत नियत ठेवीच्या स्वरुपात, विद्यापीठाकडून गुंतविण्यात येईल.

सर्वसाधारण निधी.

१४. विद्यापीठ, सर्वसाधारण निधी म्हणून संबोधण्यात येणारा एक निधीदेखील घटित करील, ज्यामध्ये पुढील रकमा जमा करण्यात येतील :—

(एक) विद्यापीठाला मिळालेले शुल्क व इतर आकार ;

(दोन) प्रायोजक मंडळाने दिलेले कोणतेही अंशदान ;

(तीन) संयंत्रणा व विद्यापीठाने हाती घेतलेली इतर कामे यांमधून मिळालेले कोणतेही उत्पन्न ;

(चार) मृत्युपत्रित दान, देणग्या, दाननिधी आणि इतर कोणतीही अनुदाने ; आणि

(पाच) विद्यापीठाला मिळालेल्या इतर सर्व रकमा.

सर्वसाधारण निधीचे उपयोजन.

१५. विद्यापीठाच्या कारभाराच्या संबंधातील सर्व आवर्ती किंवा अनावर्ती खर्च भागविण्यासाठी सर्वसाधारण निधीचा वापर करण्यात येईल :

परंतु, व्यवस्थापकीय मंडळाकडून निश्चित करण्यात येईल अशा, त्या वर्षाच्या एकूण आवर्ती खर्चाच्या आणि एकूण अनावर्ती खर्चाच्या मर्यादेपेक्षा कोणताही अधिक खर्च, व्यवस्थापकीय मंडळाच्या पूर्वमान्यतेशिवाय, विद्यापीठाकडून करण्यात येणार नाही.

विद्यापीठाचे अधिकारी.

१६. विद्यापीठाचे अधिकारी पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) अध्यक्ष, जो विद्यापीठाचा कुलपती देखील असेल ;

(दोन) कुलगुरू ;

(तीन) विद्याशाखांचे अधिष्ठाते ;

(चार) कुलसचिव ;

(पाच) मुख्य वित्त व लेखा अधिकारी ;

(सहा) संचालक, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन ; आणि

(सात) विद्यापीठाचे अधिकारी म्हणून परिनियमांद्वारे घोषित करण्यात येतील अशा, विद्यापीठाच्या सेवेतील इतर व्यक्ती.

अध्यक्ष.

१७. (१) प्रायोजक मंडळ, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने, शासनाच्या मान्यतेने, पाच वर्षांच्या कालावधीसाठी अध्यक्षाची नियुक्ती करील.

(२) अध्यक्ष पदाची पात्रता व निकष, नियम व विनियम यांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(३) अध्यक्ष हा, विद्यापीठाचा प्रमुख असेल.

(४) अध्यक्ष, नियामक मंडळाच्या बैठकींचे आणि पदवी, पदविका किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाध्या प्रदान करण्यासाठी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवील.

(५) अध्यक्षाला पुढील अधिकार असतील :—

(क) विद्यापीठाच्या कामकाजाच्या संबंधात, विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा प्राधिकरणाकडून कोणतीही माहिती किंवा अभिलेख मागविणे ;

(ख) कुलगुरुची नियुक्ती करणे ;

(ग) या अधिनियमाच्या कलम २० च्या तरतुदीनुसार कुलगुरुला पदावरून दूर करणे ;

(घ) परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे इतर अधिकार.

अध्यक्षाला पदावरून दूर करणे.

१८. जर अध्यक्षपद धारण करणारी व्यक्ती,—

(क) विकल मनाची असेल आणि ती तशी असल्याचे सक्षम न्यायालयाने घोषित केले असेल ; किंवा

(ख) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाकरिता एखाद्या न्यायालयाकडून तिला दोषसिद्ध ठरविण्यात आले असेल ; किंवा

(ग) अविमुक्त नादार झालेली असेल आणि सक्षम न्यायालयाकडून ती तशी असल्याचे घोषित केले असेल ; किंवा

(घ) दीर्घ आजारपणामुळे किंवा विकलांगतेमुळे त्या पदाची कार्ये किंवा कर्तव्ये बजावण्यास ती शारीरिकदृष्ट्या अपात्र आणि असमर्थ झाली असेल ; किंवा

(ङ) तिने, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याचे हेतुपुरस्सर टाळले असेल किंवा त्यास नकार दिला असेल ; किंवा सेवा संविदेच्या कोणत्याही अटी व शर्तींचा किंवा, परिनियमांद्वारे विहित केलेल्या अन्य कोणत्याही शर्तींचा भंग केला असेल, किंवा तिच्याकडे निहित असलेल्या अधिकारांचा दुरुपयोग केला असेल किंवा ती अध्यक्ष म्हणून त्या पदावर असण्याचे चालू ठेवणे विद्यापीठाच्या हिताच्या दृष्टीने हानिकारक झाले असेल,

याबद्दल प्रायोजक मंडळाची खात्री पटली असेल तर, प्रायोजक मंडळ, तिला त्या पदावरून दूर करू शकेल :

परंतु, खंड (घ) किंवा (ङ) अन्वये अध्यक्षाला उक्त पदावरून दूर करण्याची कारवाई करण्यापूर्वी प्रायोजक मंडळाकडून, त्याला कारणे दाखविण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

कुलगुरू. **१९.** (१) अध्यक्षाद्वारे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियम व विनियमानुसार घटित केलेल्या शोध-निवड समितीने शिफारस केलेल्या तीन व्यक्तींच्या नामिकेमधून, उक्त नियम व विनियमानुसार पात्रता निकषांची पूर्तता करणाऱ्या आणि परिनियमाद्वारे किंवा विनियमाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तींवर कुलगुरूंची नियुक्ती करण्यात येईल. कुलगुरू, कलम २० मध्ये अंतर्भूत असणाऱ्या तरतुदींना अधीन राहून तीन वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील :

परंतु, तीन वर्षांची मुदत समाप्त झाल्यानंतर, कुलगुरु, आणखी तीन वर्षांच्या मुदतीकरिता पुर्नियुक्तीसाठी पात्र असेल :

परंतु आणखी असे की, कुलगुरू, उक्त मुदत समाप्त झाल्यानंतरदेखील, नवीन कुलगुरू त्याच्या पदावर रूजू होईपर्यंत, त्याचे पद धारण करणे सुरू ठेवील, तथापि, कोणत्याही परिस्थितीत, हा कालावधी एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

(२) कुलगुरू हा, विद्यापीठाचा प्रमुख कार्यकारी व विद्याविषयक अधिकारी असेल आणि त्याला, विद्यापीठाच्या कामकाजाचे अधीक्षण करण्याचे आणि त्यावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार असतील आणि तो, विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या निर्णयांची अंमलबजावणी करील.

(३) कुलगुरू, अध्यक्षाच्या अनुपस्थितीत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवील.

(४) ज्यासाठी या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये इतर कोणत्याही प्राधिकरणाला अधिकार प्रदान केलेले आहेत अशा कोणत्याही बाबींवर तात्काळ कारवाई करणे आवश्यक आहे असे कुलगुरुचे मत असेल तर, तो, त्याला आवश्यक वाटेल अशी कारवाई करू शकेल आणि त्याने केलेल्या कारवाईचा अहवाल, त्यानंतर, लवकरात लवकर, सर्वसाधारण नित्यक्रमात ज्या अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने, ती बाब हाताळली असती अशा अधिकाऱ्याला किंवा प्राधिकरणाला देईल :

परंतु, अशी कारवाई कुलगुरूने करावयास नको होती, असे संबंधित अधिकाऱ्याचे किंवा प्राधिकरणाचे मत असेल तर, असे प्रकरण निर्णयार्थ अध्यक्षाकडे पाठवण्यात येईल आणि त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

(५) कुलगुरूच्या मते, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही निर्णय, हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले परिनियम, आदेश, विनियम किंवा नियम यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांच्या कक्षेबाहेरील असेल किंवा त्यामुळे विद्यापीठाच्या हितांस बाधा पोहोचण्याची शक्यता असेल तर, तो, निर्णयाच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत त्याचा निर्णय बदलण्याची संबंधित प्राधिकरणाला विनंती करील आणि जर प्राधिकरणाने अशा निर्णयात पूर्णपणे किंवा अंशतः सुधारणा करण्यास नकार दिला, किंवा पंधरा दिवसांच्या आत कोणताही निर्णय घेण्यास निष्फळ ठरले तर, अशी बाब, निर्णयार्थ अध्यक्षाकडे पाठवण्यात येईल आणि त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

(६) कुलगुरू, परिनियमांद्वारे किंवा आदेशांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.

(७) प्रतिवेदन मिळाल्यावर किंवा अन्यथा आणि आवश्यक वाटेल अशी चौकशी करण्यात आल्यानंतर, कोणत्याही वेळी तशी खात्री देणारी परिस्थितीची निकड असेल तर, आणि जर कुलगुरू पदावर राहणे विद्यापीठाच्या हिताचे नसेल तर, अध्यक्षास, नियामक मंडळाच्या मान्यतेने, लेखी आदेशाद्वारे, त्यात कारणे नमूद करून, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून कुलगुरूला त्याचे पद सोडण्यास सांगता येईल :

परंतु, या पोट-कलमान्वये कार्यवाही करण्यापूर्वी कुलगुरूला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

कुलगुरूला पदावरून दूर करणे.

२०. जर कुलगुरू पद धारण करणारी व्यक्ती,—

(क) विकल मनाची असेल आणि ती तशी असल्याचे सक्षम न्यायालयाने घोषित केले असेल ; किंवा

(ख) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाकरिता एखाद्या न्यायालयाकडून तिला दोषसिद्ध ठरविण्यात आले असेल ; किंवा

(ग) अविमुक्त नादार झालेली असेल आणि सक्षम न्यायालयाकडून ती तशी असल्याचे घोषित केले असेल ; किंवा

(घ) दीर्घ आजारपणामुळे किंवा विकलांगतेमुळे त्या पदाची कार्ये किंवा कर्तव्ये बजावण्यास ती शारीरिकदृष्ट्या अपात्र आणि असमर्थ झाली असेल ; किंवा

(ङ) तिने, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याचे हेतुपुरस्सर टाळले असेल किंवा त्यास नकार दिला असेल किंवा सेवा संविदेच्या कोणत्याही अटी व शर्तींचा किंवा परिनियमांद्वारे निर्धारित केलेल्या अन्य कोणत्याही शर्तींचा भंग केला असेल, किंवा तिच्याकडे निहित असलेल्या अधिकारांचा दुरुपयोग केला असेल किंवा ती कुलगरू म्हणून त्या पदावर असण्याचे चालू ठेवणे विद्यापीठाच्या हिताच्या दृष्टीने हानिकारक झाले असेल,

याबद्दल अध्यक्षाची खात्री पटली असेल तर, तो, तिला त्या पदावरून दूर करु शकेल :

परंतु, खंड (घ) किंवा (ङ) अन्वये कुलगुरुला त्या पदावरून दूर करण्याची कारवाई करण्यापूर्वी, अध्यक्षाकडून, त्याला कारणे दाखविण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

विद्याशाखांचे अधिष्ठाते.

२१. (१) विद्याशाखांच्या अधिष्ठात्यांची नियुक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने व सेवेच्या अशा अटी व शर्तींवर अध्यक्षाकडून करण्यात येईल.

(२) विद्याशाखांचे अधिष्ठाते हे, विद्यापीठाचे विद्याविषयक व इतर कामकाजाचे व्यवस्थापन करण्यामध्ये कुलगुरुला सहाय्य करतील आणि ते, विनियमांद्वारे विहित करण्यात येतील किंवा अध्यक्ष व कुलगुरु यांच्याकडून सोपविण्यात येतील, अशा अधिकारांचा वापर करतील आणि अशी कार्ये पार पाडतील.

कुलसचिव.

२२. (१) कुलसचिवाची नियुक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि सेवेच्या अशा अटी व शर्तींवर अध्यक्षाकडून करण्यात येईल.

(२) कुलसचिव, विद्यापीठाचा मुख्य प्रशासकीय अधिकारी असेल. विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या निर्णयास अधीन राहून, त्यास विद्यापीठाच्या वतीने करारनामा करण्याचा, करार करण्याचा, दस्तऐवजांवर स्वाक्षरी करण्याचा व अभिलेख अधिप्रमाणित करण्याचा अधिकार असेल. तो, परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.

(३) कुलसचिव, नियामक मडळ, व्यवस्थापन मंडळ व विद्यापरिषद यांचा सदस्य-सचिव असेल, परंतु, त्यास मत देण्याचा हक्क असणार नाही.

(४) कुलसचिव, विद्यापीठाचे अभिलेख, सामाईक मोहोर यांचा आणि नियामक मंडळ त्याच्याकडे सुपूर्द करील अशा इतर मालमत्तेचा अभिरक्षक असेल.

(५) कुलसचिव हा, या अधिनियमांद्वारे किंवा त्या अन्वये विहित करण्यात येतील अशा, किंवा,परिनियमांद्वारे त्याला प्रदान करण्यात येतील अशा किंवा कुलगुरूकडून त्यास वेळोवेळी, सोपविण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि अशी इतर कार्ये पार पाडील.

संचालक, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन.

२३. (१) संचालक, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन याची नियुक्ती ही, परिनियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा सेवेच्या अटी व शर्ती यांवर अध्यक्षाकडून करण्यात येईल.

(२) संचालक, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन हा, विद्यापीठाच्या परीक्षा व चाचणी परीक्षा घेणे आणि त्यांचे निकाल घोषित करणे या गोष्टींचा मुख्य प्रभारी अधिकारी असेल. तो, कुलगुरूच्या अधीक्षणाखाली, निदेशनाखाली आणि मार्गदर्शनाखाली आपली कार्ये पार पाडील.

(३) संचालक, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन हा, विद्यापीठाचा पूर्ण वेळ वेतनी अधिकारी असेल आणि तो, थेट विद्यापीठाच्या कुलगुरूच्या निदेशनाखाली आणि नियंत्रणाखाली काम करील. त्याची नियुक्ती, तीन वर्षांच्या मुदतीसाठी असेल आणि तो, तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या आणखी एका मुदतीसाठी पुनर्नियुक्तीस पात्र असेल. मूल्यनिर्धारण व मूल्यमापन संचालकाच्या निवडीच्या प्रयोजनासाठी अर्हता व अनुभव हा, परिनियमाद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(४) संचालक, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन पुढील गोष्टींसाठी जबाबदार असेल :—

(क) परीक्षांची नियामिका तयार करणे व ती आगाऊ घोषित करणे ;

(ख) प्रश्नपत्रिकांच्या मुद्रणाची व्यवस्था करणे ;

(ग) परीक्षांचा आणि इतर चाचणी परीक्षांचा निकाल वेळेवर प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करणे ;

(घ) परीक्षांशी संबंधित असलेले आणि परीक्षांच्या संबंधात गैरप्रकाराबद्दल दोषी आढळून आलेले उमेदवार, प्राध्निक, परीक्षक, नियामक किंवा इतर कोणत्याही व्यक्ती यांच्याविरुद्ध आवश्यक असेल तेथे शिस्तभंगाची कारवाई करणे ;

(ङ) विद्यापीठ परीक्षांच्या निकालांचा वेळोवेळी आढावा घेणे आणि त्यावरील अहवाल विद्यापरिषदेला पाठवणे.

(५) संचालक, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन हा, विहित करण्यात येतील अशा किंवा त्याच्याकडे सोपवण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

मुख्य वित्त व लेखा अधिकारी.

२४. (१) मुख्य वित्त व लेखा अधिकारी, विद्यापीठाचा प्रमुख वित्त, लेखा व लेखापरीक्षा अधिकारी असेल.

(२) मुख्य वित्त व लेखा अधिकाऱ्याची नियुक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि सेवेच्या अशा अटी व शर्तींवर अध्यक्षाकडून करण्यात येईल.

(३) मुख्य वित्त व लेखा अधिकारी, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील किंवा अशी कर्तव्ये पार पाडील.

इतर अधिकारी.

२५. (१) विद्यापीठास, त्याची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

(२) विद्यापीठाच्या इतर अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची रीत, अशा अधिकाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांचे अधिकार व कार्ये ही, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशी असतील.

विद्यापीठाची प्राधिकरणे.

२६. विद्यापीठाची प्राधिकरणे, पुढीलप्रमाणे असतील :—

(क) नियामक मंडळ ;

(ख) व्यवस्थापन मंडळ ;

(ग) विद्यापरिषद ;

(घ) मुल्यनिर्धारण व मुल्यमापन मंडळ ; आणि

(ङ) विद्यापीठाची प्राधिकरणे म्हणून परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशी विद्यापीठाची इतर प्राधिकरणे.

नियामक मंडळ.

२७. (१) विद्यापीठाच्या नियामक मंडळात पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :—

(क) अध्यक्ष ;

(ख) कुलगुरु ;

(ग) प्रायोजक मंडळाकडून नामनिर्देशित केलेल्या पाच व्यक्ती त्यापैकी दोन ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ आणि उर्वरित कौशल्य विकासातील पाच वर्षांचा अनुभव असणारे औद्योगिक तज्ज्ञ असतील ;

(घ) अध्यक्षाने नामनिर्देशित केलेला, व्यवस्थापन किंवा माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रातील विद्यापीठाबाहेरील एक तज्ज्ञ ;

(ङ) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेली कौशल्य विकासातील पाच वर्षांचा अनुभव असलेल्या दोन व्यक्ती ;

(च) विद्यापीठाचा कुलसचिव हा, नियामक मंडळाचा कायमस्वरूपी आमंत्रित असेल, परंतु, त्याला मत देण्याचा अधिकार नसेल.

(२) नियामक मंडळ हे, विद्यापीठाचे सर्वोच्च प्राधिकरण असेल.

(३) नियामक मंडळास पुढील अधिकार असतील,—

(क) हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम, परिनियम, आदेश किंवा विनियम यांद्वारे तरतूद करण्यात आले असतील अशा सर्व अधिकारांचा वापर करून, विद्यापीठाचे सर्वसाधारण अधीक्षण, गुणवत्ता नियंत्रण व निदेशन यांची तरतूद करणे आणि विद्यापीठाच्या कामकाजाचे नियंत्रण करणे ;

(ख) विद्यापीठाच्या इतर प्राधिकरणांचे निर्णय, या अधिनियमाच्या तरतुदींशी किंवा त्याखाली केलेल्या नियमांशी, परिनियमांशी, आदेशांशी किंवा विनियमांशी अनुरुप नसतील तेव्हा, त्या निर्णयांचे पुनर्विलोकन करणे ;

(ग) विद्यापीठाच्या अर्थसंकल्पास व वार्षिक अहवालास मान्यता देणे ;

(घ) विद्यापीठाने अनुसरावयाची धोरणे निर्धारित करणे ;

(ङ) सर्व प्रयत्न करूनदेखील विद्यापीठाचे कामकाज सुरळीतपणे चालणे शक्य नाही अशी परिस्थिती उद्‌भवेल तेव्हा, विद्यापीठाचे स्वेच्छेने परिसमापन करण्याविषयी प्रायोजक मंडळास शिफारस करणे ; आणि

(च) परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील असे इतर अधिकार.

(४) नियामक मंडळ हे, एका कॅलेंडर वर्षात किमान तीन वेळा किंवा प्रत्येक चार महिन्यातून एकदा बैठक घेईल.

(५) नियामक मंडळाच्या बैठकींसाठीची गणपूर्ती पाच इतकी असेल.

व्यवस्थापन मंडळ.

२८. (१) व्यवस्थापन मंडळात, पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :—

(क) कुलगुरू ;

(ख) प्रायोजक मंडळाने नामनिर्देशित केलेले, नियामक मंडळाचे दोन सदस्य ;

(ग) कुलगुरुने, आळीपाळीने नामनिर्देशित करावयाचे, विद्याशाखांचे दोन अधिष्ठाते ;

(घ) प्रायोजक मंडळाने नामनिर्देशित केलेल्या, नियामक मंडळाच्या सदस्य नसलेल्या तीन व्यक्ती ; आणि

(ङ) प्रायोजक मंडळाने, अध्यापकांमधून नामनिर्देशित केलेल्या तीन व्यक्ती ;

(च) कुलसचिव, सदस्य-सचिव.

(२) कुलगुरू, व्यवस्थापन मंडळाचा अध्यक्ष असेल.

(३) व्यवस्थापन मंडळाचे अधिकार व कार्ये, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(४) व्यवस्थापन मंडळ, दर दोन महिन्यांतून किमान एकदा बैठक बोलावील.

(५) व्यवस्थापन मंडळाच्या बैठकींची गणपूर्ती, पाच इतकी असेल.

विद्यापरिषद.

२९. (१) विद्यापरिषदेमध्ये, कुलगुरु आणि परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील असे इतर सदस्य यांचा अंतर्भाव असेल.

(२) कुलगुरू हा, विद्यापरिषदेचा पदसिद्ध अध्यक्ष असेल.

(३) विद्यापरिषद ही, विद्यापीठाचे प्रमुख विद्याविषयक मंडळ असेल आणि या अधिनियमाच्या तरतुदींना आणि त्याखाली केलेल्या नियमांना, परिनियमांना किंवा आदेशांना अधीन राहून, विद्यापीठाचे समन्वयन करील आणि विद्यापीठाच्या विद्याविषयक धोरणाचे सर्वसाधारण पर्यवेक्षण करील.

(४) विद्यापरिषदेच्या बैठकीची गणपूर्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

मूल्यनिर्धारण व मूल्यमापन मंडळ.

३०. (१) मूल्यनिर्धारण व मूल्यमापन मंडळ हे, परीक्षांचे संचलन करण्याच्या आणि परीक्षा आयोजित करण्याच्या व त्या घेण्याच्या संबंधात धोरणात्मक निर्णय घेणे, कौशल्याधारित निर्धारणासाठी व अधिगुणांकनासाठी योजना किंवा धोरण आखणे, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन यांच्या पद्धतीत सुधारणा करणे, प्राज्ञिक, परीक्षक, नियामक, उद्योगातील कौशल्य मूल्यनिर्धारक यांची नियुक्ती करणे आणि तसेच मूल्यनिर्धारण व मूल्यमापन यांचे वेळापत्रक तयार करणे आणि निकाल घोषित करणे यांसाठी विद्यापीठाचे प्रमुख प्राधिकरण असेल. मूल्यनिर्धारण व मूल्यमापन मंडळ, परीक्षा केंद्रांत, कौशल्य केंद्रांत, अभ्यास केंद्रांत किंवा विद्यापीठाशी संबंधित कोणत्याही केंद्रात संचलित होणाऱ्या परीक्षांचे देखील पर्यवेक्षण व विनियमन करील.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या आणि कलम ४४ च्या प्रयोजनार्थ, " मूल्यनिर्धारण व मूल्यमापन यांचे वेळापत्रक " या शब्दप्रयोगाचा अर्थ, परीक्षांच्या योजनेचा एक भाग असलेली प्रत्येक प्रश्नपत्रिका सुरू होण्याची वेळ, दिवस व दिनांक यांविषयीचा तपशील देणारे वेळापत्रक, असा आहे आणि त्यामध्ये प्रात्यक्षिक परीक्षांविषयीच्या तपशिलांचादेखील समावेश आहे.

(२) मूल्यनिर्धारण व मूल्यमापन मंडळात पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :—

(क) कुलगुरु-अध्यक्ष ;

(ख) कुलगुरूंनी आळीपाळीने नामनिर्देशित करावयाचे, विद्यापीठाच्या विद्याशाखांचे दोन अधिष्ठाते ;

(ग) मूल्यनिर्धारण व मूल्यमापन मंडळाने स्वीकृत केलेला एक मूल्यमापन तज्ज्ञ-सदस्य ; आणि

(घ) संचालक, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन मंडळ-सदस्य-सचिव.

(३) मूल्यनिर्धारण व मूल्यमापन मंडळाचे अधिकार आणि कार्ये, परिनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

इतर प्राधिकरणे.

३१. विद्यापीठाच्या इतर प्राधिकरणांची रचना, अधिकार व कार्ये, परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी असतील.

अपात्रता.

३२. जर एखादी व्यक्ती,—

(एक) विकल मनाची असेल आणि एखाद्या सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केले असेल ; किंवा

(दोन) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल तिला दोषी ठरविलेले असेल ; किंवा

(तीन) ती स्वतः खाजगी शिकवणी वर्ग घेत असेल किंवा खाजगी शिकवणी वर्ग चालवत असेल ; किंवा

(चार) कोणत्याही परीक्षा घेताना, कोणत्याही प्रकारे, कोठेही, अनुचित व्यवहार केल्याबद्दल किंवा त्यास चालना दिल्याबद्दल तिला शिक्षा झालेली असेल,

तर, अशा कोणत्याही व्यक्तीस, विद्यापीठाच्या प्राधिकरणांपैकी किंवा मंडळांपैकी कोणत्याही प्राधिकरणाचा किंवा मंडळाचा सदस्य होण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

रिक्त पदांमुळे विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा मंडळाची कृती किंवा कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.

३३. विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा मंडळाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, केवळ त्यात कोणतेही पद रिक्त असल्याच्या किंवा त्याच्या रचनेत दोष असल्याच्या कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही.

नैमित्तिक रिक्त पदे भरणे.

३४. एखाद्या सदस्याचा मृत्यू, राजीनामा किंवा त्याला काढून टाकणे यांमुळे विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणातील किंवा मंडळातील कोणतेही नैमित्तिक पद रिक्त झाले असेल त्याबाबतीत, ते पद, ज्या सदस्याचे पद रिक्त झाले असेल त्या सदस्याच्या जागी एखाद्या व्यक्तीची नियुक्ती करून किंवा तिला नामनिर्देशित करून, शक्य तितक्या लवकर भरण्यात येईल ; आणि नैमित्तिक रिक्त पद भरण्यासाठी अशा प्रकारे नियुक्त केलेली किंवा नामनिर्देशित केलेली व्यक्ती ही, ज्या सदस्याच्या जागी तिला अशा प्रकारे नियुक्त किंवा नामनिर्देशित केले असेल अशा सदस्याच्या उर्वरित मुदतीकरिता, अशा प्राधिकरणाची किंवा मंडळाची सदस्य असेल.

समित्या.

३५. (१) विद्यापीठाच्या प्राधिकरणांना किंवा अधिकाऱ्यांना, समित्यांकडून पार पाडल्या जाणाऱ्या विनिर्दिष्ट कामांसाठी आवश्यक असतील अशा विचारार्थ विषयांनुसार अशा समित्या घटित करता येतील.

(२) अशा समित्यांची रचना, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी असेल.

पहिले परिनियम.

३६. (१) विद्यापीठाचे पहिले परिनियम, नियामक मंडळाकडून तयार करण्यात येतील आणि शासनाच्या मान्यतेसाठी ते, शासनाकडे सादर करण्यात येतील.

(२) या अधिनियमाच्या, आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींस अधीन राहून, विद्यापीठाच्या पहिल्या परिनियमांमध्ये, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) वेळोवेळी घटित करण्यात येतील अशी, विद्यापीठाची प्राधिकरणे व इतर मंडळे यांची रचना, अधिकार व कर्तव्ये ;

(ख) कुलगुरूच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती आणि त्याचे अधिकार व कार्ये ;

(ग) विद्याशाखांचे अधिष्ठाते, कुलसचिव आणि मुख्य वित्त व लेखा अधिकारी यांच्या नियुक्तीची रीत आणि सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांचे अधिकार व कार्ये ;

(घ) कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची रीत आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांचे अधिकार व कार्ये ;

(ङ) कर्मचारी, विद्यार्थी व विद्यापीठ यांच्यामधील विवादांच्या बाबतीत, लवादाची कार्यपद्धती ;

(च) मानद पदव्या प्रदान करणे ;

(छ) शिक्षण शुल्क देण्यापासून विद्यार्थ्यांना सूट देण्यासंबंधीच्या आणि त्यांना शिष्यवृत्या व छात्रवृत्त्या प्रदान करण्यासंबंधीच्या तरतुदी ;

(ज) राखीव जागांचे विनियमन करण्यासह विविध पाठ्यक्रमांमधील प्रवेश व जागांची संख्या यांच्या धोरणासंबंधातील तरतुदी ; आणि

(झ) विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्कांसंबंधातील तरतुदी.

(३) शासन, विद्यापीठाने सादर केलेले पहिले परिनियम विचारात घेईल आणि ते मिळाल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या आत, त्याला आवश्यक वाटतील अशा फेरबदलांसह, कोणतेही असल्यास, त्यांना आपली मान्यता देईल.

नंतरचे परिनियम.

३७. (१) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींस अधीन राहून, विद्यापीठाच्या नंतरच्या परिनियमांमध्ये, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) विद्यापीठाच्या नवीन प्राधिकरणांची निर्मिती करणे ;

(ख) लेखांकन धोरण व वित्तीय कार्यपद्धती ;

(ग) विद्यापीठाच्या प्राधिकरणांमधील अध्यापकांचे प्रतिनिधित्व ;

(घ) नवीन विभागांची निर्मिती आणि विद्यमान विभाग बंद करणे किंवा त्यांची पुनर्रचना करणे ;

(ङ) पदके व पारितोषिके सुरू करणे ;

(च) पदनिर्मिती व पदे रद्द करण्याची कार्यपद्धती ;

(छ) शुल्कामध्ये सुधारणा करणे ;

(ज) वेगवेगळ्या अभ्यासक्रमांमधील जागांच्या संख्येत फेरबदल करणे ; आणि

(झ) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करावयाच्या आहेत अशा इतर सर्व बाबी.

(२) पहिल्या परिनियमांव्यतिरिक्त, विद्यापीठाचे परिनियम हे, नियामक मंडळाच्या मान्यतेने व्यवस्थापन मंडळाकडून करण्यात येतील.

(३) व्यवस्थापन मंडळास, वेळोवेळी, नवीन किंवा अतिरिक्त परिनियम करता येतील किंवा अशा प्रकारे केलेल्या परिनियमांमध्ये, या कलमामध्ये यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने सुधारणा करता येईल किंवा त्यांचे निरसन करता येईल :

परंतु, व्यवस्थापन मंडळ हे, विद्यापीठाच्या कोणत्याही विद्यमान प्राधिकरणाला प्रस्तावावर मत मांडण्याची संधी देण्यात येईपर्यंत, अशा प्राधिकरणाचा दर्जा, अधिकार किंवा रचना यांना बाधक ठरणारा कोणताही परिनियम करणार नाही किंवा परिनियमांमध्ये कोणतीही सुधारणा करणार नाही, आणि अशा प्रकारे मांडलेले कोणतेही मत लेखी असेल व ते नियामक मंडळाकडून विचारात घेण्यात येईल.

(४) असे प्रत्येक परिनियम किंवा त्या परिनियमांमध्ये भर घालणे किंवा परिनियमांमध्ये कोणतीही सुधारणा करणे किंवा त्यांचे निरसन करणे या बाबी, शासनाच्या मान्यतेच्या अधीन असतील :

परंतु, विद्यार्थ्यांची शिस्त आणि अध्यापन, शिक्षण व परीक्षा यांचा दर्जा यांना बाधक ठरणारा कोणताही परिनियम, विद्यापरिषदेशी विचारविनिमय केल्याखेरीज, व्यवस्थापन मंडळाकडून, करण्यात येणार नाही.

पहिले आदेश.

३८. (१) विद्यापीठाचे पहिले आदेश, नियामक मंडळाकडून काढण्यात येतील आणि ते, मंडळाकडून, मान्यतेसाठी शासनाला सादर करण्यात येतील.

(२) या अधिनियमाच्या तरतुदींना आणि त्याखाली केलेल्या नियमांस किंवा परिनियमांस अधीन राहून, व्यवस्थापन मंडळास, विद्यापीठाच्या उद्दिष्टांना चालना देण्यासाठी त्याला योग्य वाटेल असे पहिले आदेश, नियामक मंडळाच्या मान्यतेने, काढता येतील आणि त्या आदेशांमध्ये, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देणे आणि त्याप्रमाणे त्यांची नावनोंदणी करणे ;

(ख) विद्यापीठाच्या पदव्या, पदविका व प्रमाणपत्रे यांसाठी निर्धारित करावयाचे अभ्यास पाठ्यक्रम ;

(ग) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाध्या प्रदान करणे, त्यांची किमान अर्हता आणि त्या देण्याच्या व मिळण्याच्या संबंधात करावयाच्या उपाययोजना ;

(घ) छात्रवृत्त्या, शिष्यवृत्ती, विद्यावेतने, पदके व पारितोषिके प्रदान करण्यासाठीच्या शर्ती;

(ङ) परीक्षा मंडळे, परीक्षक व नियामक यांचा पदावधी व त्यांच्या नियुक्तीची रीत आणि कर्तव्ये यांसह परीक्षा घेणे;

(च) विद्यापीठाचे विविध पाठ्यक्रम, परीक्षा, पदव्या व पदविका यांच्यासाठी आकारावयाचे शुल्क;

(छ) विद्यापीठाच्या वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांच्या निवासाच्या शर्ती;

(ज) विद्यार्थ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यासंबंधातील तरतुदी;

(झ) विद्यापीठाच्या शैक्षणिक वातावरणात सुधारणा करण्यासाठी ज्याची आवश्यकता वाटली असेल अशा इतर कोणत्याही मंडळाची निर्मिती, रचना व कार्ये;

(ञ) उच्च शिक्षणाच्या बाबतीत इतर विद्यापीठांशी आणि परिसंस्थांशी सहकार्य करण्याची व सहयोग करण्याची रीत ; आणि

(ट) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या परिनियमांच्या तरतुदींन्वये ज्या बाबींची आदेशांमध्ये तरतूद करण्याची आवश्यकता आहे अशा इतर सर्व बाबी.

(३) शासन, पोट-कलम (१) अन्वये कुलगुरुने सादर केलेल्या पहिल्या आदेशांवर विचार करील आणि ते मिळाल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या आत, त्याला आवश्यक वाटतील अशा फेरबदलांसह, कोणतेही असल्यास, आपली मान्यता देईल.

नंतरचे आदेश.

३९. (१) पहिल्या आदेशांव्यतिरिक्त इतर सर्व आदेश, विद्यापरिषदेकडून काढण्यात येतील आणि त्यांस व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर ते, नियामक मंडळाच्या मान्यतेसाठी त्याच्याकडे सादर करण्यात येतील.

(२) विद्यापरिषद, एकतर व्यवस्थापन मंडळाच्या व नियामक मंडळाच्या सूचनांचा अंतर्भाव करून आदेशांमध्ये फेरबदल करील किंवा त्या सूचनांचा अंतर्भाव न करण्याची कारणे देईल, आणि अशा कारणांसह, कोणतीही असल्यास, आदेश परत पाठवील आणि व्यवस्थापन मंडळ आणि नियामक मंडळ, विद्यापरिषदेच्या सूचना विचारात घेतील आणि अशा फेरबदलांसह किंवा फेरबदलांशिवाय, विद्यापीठाच्या आदेशांना मान्यता देतील आणि त्यानंतर, नियामक मंडळाने मान्यता दिल्याप्रमाणे ते आदेश अंमलात येतील.

विनियम.

४०. विद्यापीठाच्या प्राधिकरणांना, व्यवस्थापन मंडळाच्या पूर्व मान्यतेच्या अधीन राहून, त्यांचे स्वतःचे आणि त्यांनी नियुक्त केलेल्या समित्यांचे कामकाज चालवण्यासाठी, या अधिनियमांच्या तरतुदींशी आणि त्याखाली केलेले नियम, परिनियम किंवा आदेश यांच्याशी सुसंगत असे विनियम करता येतील.

प्रवेश.

४१. (१) विद्यापीठामधील प्रवेश, गुणवत्तेच्या आधारावर काटेकोरपणे देण्यात येईल.

(२) विद्यापीठामधील प्रवेशाची गुणवत्ता, एकतर प्रवेशासाठी असलेल्या अर्हताकारी परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या किंवा श्रेणीच्या आधारे आणि अभ्यासानुवर्ती व पाठ्येत्तर कार्यक्रमांमधील संपादणुकींच्या आधारे किंवा एकतर तत्सम पाठ्यक्रम चालविणाऱ्या विद्यापीठांच्या संघाने किंवा राज्यातील कोणत्याही अभिकरणाने राज्य स्तरावर घेतलेल्या प्रवेश चाचणीत मिळालेल्या गुणांच्या किंवा श्रेणीच्या आधारे निर्धारित करता येईल :

परंतु, व्यावसायिक व तंत्र पाठ्यक्रमांमधील प्रवेश, केवळ प्रवेश चाचणी मार्फतच देण्यात येतील.

(३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) यांमधील विद्यार्थ्यांकरिता आणि दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठांमधील प्रवेशासाठी राज्य शासनाच्या धोरणानुसार जागा राखून ठेवण्यात येतील.

(४) एकूण मंजूर प्रवेश क्षमतेपैकी चाळीस टक्के जागा, महाराष्ट्र राज्यात अधिवास असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात येतील.

शुल्क निश्चिती समिती.

४२. (१) विद्यापीठास, विविध पाठ्यक्रमांसाठी व त्यामधील देऊ केलेल्या अध्ययनक्रमांसाठी शुल्क संरचना ठरविण्याकरिता शुल्क निश्चिती समिती घटित करता येईल. अशा शुल्क निश्चिती समितीची रचना व तिचे अनुसरण करावयाची कार्यपद्धती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल, त्याप्रमाणे असेल.

(२) समिती, प्रस्तावित शुल्क,–

(क) (एक) विद्यापीठाचा आवर्ती खर्च भागविण्यासाठी संसाधने निर्माण करण्याकरिता ; आणि

(दोन) विद्यापीठाच्या पुढील विकासासाठी आवश्यक असलेल्या बचतीसाठी,

पुरेसे आहे ;

(ख) अवाजवी नाही ; आणि

(ग) नफाखोरी करण्यायोग्य नाही,

किंवा कसे हे विचारात घेतल्यानंतर, शुल्क संरचना तयार करील व ती अंतिम करील.

(३) शासनास, विद्यापीठाच्या शुल्क संरचनेचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार असेल आणि अशा पुनर्विलोकनानंतर, ते, तिच्या शुल्क संरचनेत यथोचित सुधारणा करण्याचे निदेश विद्यापीठास देईल आणि विद्यापीठ, या निदेशांची अंमलबजावणी करील.

(४) राज्य शासन, विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतलेल्या मागास प्रवर्गांमधील विद्यार्थ्यांकरिता कोणत्याही शुल्कांची प्रतिपूर्ती करणार नाही किंवा कोणतेही वित्तीय दायित्व घेणार नाही.

(५) विद्यापीठ, या कलमाअन्वये ते ज्यासाठी हक्कदार आहे त्याव्यतिरिक्त अन्य कोणतेही शुल्क, मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो, आकारणार नाही.

कॅपिटेशन शुल्क घेण्यास मनाई.

४३. (१) विद्यापीठाद्वारे किंवा त्याच्यावतीने अथवा जिच्याकडे अशा परिसंस्थेचा प्रभार आहे, किंवा जी, अशा परिसंस्थेच्या व्यवस्थापनास जबाबदार आहे अशा कोणत्याही व्यक्तीद्वारे, अशा परिसंस्थेतील कोणत्याही अभ्यास पाठ्यक्रमाला कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश देण्याच्या किंवा तो पुढे चालू ठेवण्याच्या किंवा त्याला वरच्या इयत्तेत किंवा वर्गात घालण्याच्या मोबदल्यात विद्यार्थ्याकडून किंवा त्याच्या संबंधात, कोणतेही कॅपिटेशन शुल्क वसूल करण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, व्यवस्थापनास, नवीन शैक्षणिक परिसंस्था सुरू करण्यासाठी किंवा शिष्यवृत्त्या, पारितोषिके किंवा तत्सम गोष्टी देण्यासाठी दाननिधी निर्माण करण्यासाठी दानशूर व्यक्तींकडून किंवा संघटनांकडून किंवा सार्वजनिक न्यासांकडून किंवा व्यक्तींच्या इतर कोणत्याही अधिसंघाकडून विहित रीतीने, रोख रकमेच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात सद्भावनापूर्वक देणग्या गोळा करता येतील किंवा त्या स्वीकारता येतील, परंतु, अशा देणग्या गोळा करताना किंवा स्वीकारताना, व्यवस्थापन, ते चालवित असलेल्या

कोणत्याही शैक्षणिक परिसंस्थेमध्ये, अशा देणग्यांच्या मोबदल्यात कोणत्याही जागा राखीव ठेवणार नाही. जेव्हा अशा देणग्या स्वीकारण्याच्या मोबदल्यात अशा परिसंस्थेत कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश देण्याकरिता कोणतीही जागा राखून ठेवली असेल त्याबाबतीत, अशा देणगीच्या स्वीकृतीस, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन शुल्क घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७ याच्या कलम २ च्या खंड (अ) च्या अर्थांतर्गत, कॅपिटेशन शुल्क वसूल केल्याचे मानण्यात येईल. १९८८ चा महा. ६.

मूल्यनिर्धारण व मूल्यमापन यांचे वेळापत्रक.

४४. प्रत्येक शैक्षणिकसत्राच्या सुरुवातीस आणि कोणत्याही परिस्थितीत, प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या ३० जूनच्या आत, विद्यापीठ, ते आयोजित करीत असलेल्या प्रत्येक पाठ्यक्रमासाठी सत्रनिहाय किंवा, यथास्थिति, वार्षिक मूल्यनिर्धारण व मूल्यमापन यांचे वेळापत्रक तयार करील आणि ते प्रसिद्ध करील आणि त्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे अनुपालन करील :

परंतु, जर कोणत्याही कारणास्तव, विद्यापीठ या वेळापत्रकाचे अनुपालन करण्यास असमर्थ असेल तर, ते, परीक्षेचे वेळापत्रक प्रसिद्ध झाल्यापासून त्याचे अनुपालन न करण्याबद्दलची तपशीलवार कारणे नमूद असलेला अहवाल जमेल तितक्या लवकर शासनाला सादर करील. शासनास, त्यावर भविष्यात अधिक चांगले अनुपालन होण्यासाठी त्याला योग्य वाटतील असे निदेश देता येतील.

निकाल जाहीर करणे.

४५. (१) विद्यापीठ, त्याने घेतलेल्या प्रत्येक मूल्यनिर्धारण व मूल्यमापन यांचा निकाल, त्या विशिष्ट पाठ्यक्रमाच्या मूल्यनिर्धारण व मूल्यमापन याच्या अखेरच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत जाहीर करण्याचा आटोकाट प्रयत्न करील आणि कोणत्याही परिस्थितीत तो निकाल अशा दिनांकापासून उशिरात उशिरा पंचेचाळीस दिवसांच्या आत घोषित करील :

परंतु, जर कोणत्याही कारणास्तव पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत, कोणत्याही मूल्यनिर्धारण व मूल्यमापन याचा निकाल अंतिमरीत्या जाहीर करणे विद्यापीठाला शक्य झाले नाही तर, ते अशा विलंबाची तपशीलवार कारणे नमूद असलेला एक अहवाल शासनाला सादर करील. शासनास, त्यावर भविष्यात अधिक चांगले अनुपालन होण्यासाठी त्याला योग्य वाटतील असे निदेश देता येतील.

(२) विद्यापीठाने, या अधिनियमाच्या कलम ४४ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मूल्यनिर्धारण व मूल्यमापन याच्या वेळापत्रकाचे अनुपालन केले नाही, किंवा पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत विद्यापीठाने निकाल जाहीर करण्यात कसूर केली आहे, केवळ एवढ्याच कारणांवरून कोणतेही मूल्यनिर्धारण व मूल्यमापन किंवा मूल्यनिर्धारण व मूल्यमापन याचा निकाल अवैध असल्याचे मानण्यात येणार नाही.

दीक्षांत समारंभ.

४६. विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ हा पदव्या, पदविका, पारितोषिके प्रदान करण्याकरिता किंवा इतर कोणत्याही प्रयोजनाकरिता परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने प्रत्येक विद्यावर्षात आयोजित केला जाईल.

विद्यापीठाची अधिस्वीकृती.

४७. विद्यापीठ, त्याच्या स्थापनेपासून पाच वर्षांच्या आत, राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (नॅक) कडून अधिस्वीकृती मिळवील आणि राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने (नॅकने) विद्यापीठाला दिलेल्या श्रेणीविषयी ते, शासनाला व विद्यापीठाने हाती घेतलेल्या पाठ्यक्रमांशी संबंधित असलेल्या अशा इतर नियामक मंडळांना कळवील. विद्यापीठ, त्यानंतर प्रत्येक पाच वर्षांच्या कालांतराने अशा अधिस्वीकृतीचे नूतनीकरण करवून घेईल.

विद्यापीठाने विनियामक मंडळाचे नियम, विनियम, मानके, इत्यादींचे अनुपालन करणे.

४८. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, सक्षम विनियामक मंडळाचे सर्व नियम, विनियम, मानके, इत्यादींचे अनुपालन करणे आणि अशा मंडळाला, त्याची कर्तव्ये बजावण्यासाठी आणि त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडून फर्माविण्यात येतील अशा सर्व सोयीसुविधा व सहाय्य पुरविणे, विद्यापीठावर बंधनकारक असेल.

वार्षिक अहवाल.

४९. (१) विद्यापीठाचा वार्षिक अहवाल, व्यवस्थापन मंडळाकडून तयार करण्यात येईल, त्यात इतर बाबींबरोबरच विद्यापीठाने त्याच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी केलेल्या उपाययोजनांचा समावेश असेल आणि त्यास नियामक मंडळाकडून मान्यता देण्यात येईल आणि त्याची एक प्रत, प्रायोजक मंडळाला सादर करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये तयार केलेल्या वार्षिक अहवालाच्या प्रती शासनाला देखील सादर करण्यात येतील.

(३) राज्य शासन, असा अहवाल, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्याची व्यवस्था करील.

वार्षिक लेखे व लेखापरीक्षा.

५०. (१) विद्यापीठाचे वार्षिक लेखे व ताळेबंद, व्यवस्थापन मंडळाच्या निदेशांन्वये तयार करण्यात येतील आणि या प्रयोजनासाठी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून प्रत्येक वर्षी किमान एकदा वार्षिक लेख्यांची लेखापरीक्षा करण्यात येईल.

(२) लेखापरीक्षा अहवालासह वार्षिक लेख्यांची एक प्रत, नियामक मंडळाला सादर करण्यात येईल.

(३) नियामक मंडळाच्या अभिप्रायांसह वार्षिक लेख्यांची व लेखापरीक्षा अहवालाची एक प्रत, प्रायोजक मंडळाला सादर करण्यात येईल.

(४) पोट-कलम (१) अन्वये तयार केलेल्या वार्षिक लेख्यांच्या व ताळेबंदाच्या प्रती, शासनाला देखील सादर करण्यात येतील.

(५) विद्यापीठाचे लेखे व लेखापरीक्षा अहवाल यांवरील शासनाचे मत, कोणतेही असल्यास, नियामक मंडळासमोर मांडण्यात येईल आणि नियामक मंडळ, त्याला योग्य वाटतील असे निदेश देईल आणि त्यांच्या अनुपालनाबाबत शासनाला कळविण्यात येईल.

विद्यापीठाचे निरीक्षण करण्याचे शासनाचे अधिकार.

५१. (१) शासनास, या अधिनियमाच्या तरतुदींची आणि त्याखाली केलेले नियम, परिनियम किंवा आदेश यांची अंमलबजावणी किंवा अनुपालन करण्यासाठी विद्यापीठाला निदेश देता येतील.

(२) शासनास, या अधिनियमातील तरतुदींचे योग्य अनुपालन केले जात असल्याची खात्री करण्यासाठी अशा निरीक्षणाची पूर्वसूचना दिल्यानंतर, कोणत्याही वेळी, विद्यापीठाच्या प्रशासनाचे व कामकाजाचे निरीक्षण करण्यासाठी समिती नेमता येईल.

(३) शासनास, कालबद्ध अनुपालनासाठी किंवा पोट-कलम (२) अन्वये नेमलेल्या समितीने निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी विद्यापीठाला निदेश देता येतील.

(४) अध्यापन, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन यांचा व संशोधनाचा दर्जा किंवा विद्यापीठाशी संबंधित असणारी इतर कोणतीही बाब यांची सुनिश्चिती करण्याच्या प्रयोजनांसाठी, शासनास, अध्यक्षाशी व कुलगुरूशी विचारविनिमय केल्यानंतर, त्याला योग्य वाटेल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने, मूल्यनिर्धारण करण्याची व्यवस्था करता येईल.

(५) शासन, सुधारात्मक कारवाईसाठी अशा मूल्यनिर्धारणाच्या परिणामासंबंधातील त्याच्या शिफारशी विद्यापीठाला कळवील आणि विद्यापीठ, त्या शिफारशींचे अनुपालन केल्याची सुनिश्चिती करण्यासाठी आवश्यक असतील अशा सुधारात्मक उपाययोजना हाती घेईल.

(६) जर पोट-कलम (५) अन्वये केलेल्या शिफारशींचे वाजवी वेळेच्या आत, अनुपालन करण्यात विद्यापीठाने कसूर केली असेल तर, शासनास, त्याला योग्य वाटतील असे निदेश देता येतील, जे विद्यापीठावर बंधनकारक असतील.

प्रायोजक मंडळाकडून विद्यापीठाचे विसर्जन.

५२. (१) प्रायोजक मंडळास, शासनास, विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना व विद्यार्थ्यांना तशा आशयाची किमान एक वर्ष आगाऊ नोटीस देऊन विद्यापीठ विसर्जित करता येईल :

परंतु, नियमित पाठ्यक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या शेवटच्या तुकडीने त्यांचा पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतरच आणि त्यांना पदव्या, पदविका किंवा, यथास्थिति, पुरस्कार प्रदान करण्यात आल्यानंतरच केवळ विद्यापीठाचे विसर्जन अंमलात येईल.

(२) विद्यापीठाचे विसर्जन केल्यावर, विद्यापीठाच्या सर्व मत्ता व दायित्वे ही, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या अधीन राहून, प्रायोजक मंडळाकडे निहित होतील.

विवक्षित परिस्थितींमध्ये राज्य शासनाचे विशेष अधिकार असणे.

५३. (१) जर विद्यापीठाने या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे आणि त्याखाली केलेले कोणतेही नियम, परिनियम किंवा आदेश यांचे उल्लंघन केले आहे किंवा या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या कोणत्याही निदेशांचे उल्लंघन केले आहे किंवा या अधिनियमाच्या कलम ५ अन्वये दिलेल्या कोणत्याही हमीची अंमलबजावणी करण्याचे बंद केले आहे, किंवा विद्यापीठामध्ये आर्थिक गैरव्यवस्थापनाची किंवा कुप्रशासनाची परिस्थिती उद्भवली

आहे, असे शासनास दिसून आले तर, शासन, विद्यापीठाचे परिसमापन करण्याचा आदेश का देण्यात येऊ नये याबाबत पंचेचाळीस दिवसांच्या आत, कारणे दाखविण्यासाठी विद्यापीठास नोटीस काढील.

(२) शासनाची, जर पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या नोटीशीवरील विद्यापीठाचे उत्तर मिळाल्यावर, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींचे आणि त्याखाली केलेले नियम, परिनियम किंवा आदेश यांचे उल्लंघन केले असल्याचे किंवा या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे उल्लंघन केले असल्याचे किंवा या अधिनियमाच्या कलम ५ अन्वये दिलेल्या हमीची अंमलबजावणी करण्याचे बंद केले असल्याचे किंवा आर्थिक गैरव्यवस्थापनाचे अथवा कुप्रशासनाचे प्रथमदर्शनी प्रकरण असल्याबाबत खात्री पटली असेल तर, शासन, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी करण्याचे आदेश देईल.

(३) शासन, पोट-कलम (२) खालील कोणत्याही चौकशीच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही आरोपांची चौकशी करण्यासाठी आणि त्यावर अहवाल देण्यासाठी चौकशी अधिकाऱ्याची किंवा अधिकाऱ्यांची नियुक्ती करील.

(४) पोट-कलम (३) अन्वये नियुक्त केलेल्या चौकशी अधिकाऱ्याला किंवा अधिकाऱ्यांना, पुढील बाबीसंबंधात, एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खालील दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित केलेले असतात तसेच अधिकार असतील :— १९०८ चा ५.

(क) कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवणे व तिला उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) पुराव्यात सादर करता येईल अशा कोणत्याही दस्तऐवजाचा किंवा अन्य कोणत्याही वस्तूचा शोध घेण्यास आणि ती सादर करण्यास फर्माविणे ;

(ग) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख मागविणे ; आणि

(घ) नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी, इतर कोणतीही बाब.

(५) या अधिनियमान्वये चौकशी करणारा चौकशी अधिकारी हा किंवा चौकशी अधिकारी हे, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याचे कलम २१५ आणि प्रकरण अठ्ठावीस यांच्या प्रयोजनांसाठी दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येतील. २०२३ चा ४६.

(६) पोट-कलम (३) अन्वये नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडून किंवा अधिकाऱ्यांकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर, जर विद्यापीठाने या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींचे, त्याखाली केलेले नियम, परिनियम किंवा आदेश यांचे उल्लंघन केले आहे किंवा या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या कोणत्याही निदेशांचा भंग केला आहे किंवा कलम ५ अन्वये त्याने दिलेल्या हमीची अंमलबजावणी करण्याचे बंद केले आहे, किंवा विद्यापीठाच्या विद्याविषयक दर्जास धोका निर्माण होईल अशी, आर्थिक गैरव्यवस्थापनाची किंवा कुप्रशासनाची परिस्थिती विद्यापीठामध्ये उद्भवली आहे अशी शासनाची खात्री पटली तर, ते, विद्यापीठाचे परिसमापन करण्याचे प्रारंभिक आदेश देईल आणि प्रशासकाची नियुक्ती करील.

(७) पोट-कलम (६) अन्वये नियुक्त केलेल्या प्रशासकास, या अधिनियमाखालील नियामक मंडळाचे व व्यवस्थापन मंडळाचे सर्व अधिकार असतील आणि त्याने, त्यांची सर्व कर्तव्ये पार पाडणे भाग असेल आणि तो, विद्यापीठाच्या नियमित पाठ्यक्रमाच्या शेवटच्या तुकडीतील विद्यार्थी, त्यांचा पाठ्यक्रम पूर्ण करीपर्यंत आणि त्यांना पदवी, पदविका किंवा, यथास्थिति, पुरस्कार प्रदान करण्यात येईपर्यंत, विद्यापीठाचे कामकाज पाहील.

(८) नियमित पाठ्यक्रमांच्या शेवटच्या तुकडीतील विद्यार्थ्यांना पदवी, पदविका किंवा, यथास्थिति, पुरस्कार प्रदान करण्यात आल्यानंतर, प्रशासक, तशा आशयाचा अहवाल शासनाला सादर करील.

(९) शासन, पोट-कलम (८) खालील अहवाल प्राप्त झाल्यावर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विद्यापीठ विसर्जित करणारा अंतिम आदेश काढील, आणि अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून, ते विद्यापीठ विसर्जित होईल, आणि विद्यापीठाच्या सर्व मत्ता व दायित्वे, अशा दिनांकापासून प्रायोजक मंडळाकडे निहित होतील.

शिक्षा. ५४. या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करणे हा अपराध ठरेल, आणि विद्यापीठ तसेच, कलम १६ अन्वये विनिर्दिष्ट केलेले विद्यापीठाचे सर्व अधिकारी, तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु, जी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि पन्नास हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु पाच लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असतील :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन न केल्याबद्दल विद्यापीठाच्या परिसमापनाच्या कारवाईसह कोणतीही कारवाई, मग ती दिवाणी असो किंवा फौजदारी असो, सुरू करण्यापासून शासनास प्रतिबंध होतो, असा त्याचा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही.

कंपन्यांनी केलेले अपराध.

५५. (१) जेव्हा या अधिनियमाखालील किंवा त्याखाली केलेल्या नियमांखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीने केला असेल त्याबाबतीत, असा अपराध करण्यात आला त्यावेळी जी व्यक्ती कंपनीची प्रभारी होती, आणि कंपनीचे कामकाज चालवण्यास जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती तसेच कंपनी देखील, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्यांच्याविरुद्ध खटला दाखल केला जाण्यास आणि शिक्षा केली जाण्यास पात्र असेल :

परंतु, जर त्या व्यक्तीने, असा अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी तिने सर्व वाजवी दक्षता घेतली होती असे शाबीत केले तर, या पोट-कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील किंवा त्याखाली केलेल्या नियमांखालील कोणताही अपराध, एखाद्या कंपनीने केला असेल आणि तो अपराध, त्या कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी किंवा कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या संमतीने किंवा मुकसंमतीने करण्यात आला असेल अथवा त्यांनी किंवा त्यांनी केलेल्या निष्काळजीपणामुळे घडून आला असेल त्याबाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी किंवा कर्मचारी देखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरूद्ध खटला दाखल केला जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा केली जाण्यास पात्र असेल.

स्पष्टीकरण.— या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, निगम निकाय असा असून त्यामध्ये, विश्वस्त संस्थेचा, भागीदारी संस्थेचा, सोसायटीचा, संस्थेचा किंवा व्यक्तींच्या अन्य संघाचा समावेश होतो ;

(ख) (एक) भागीदारी संस्थेच्या संबंधात, "संचालक" याचा अर्थ, भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे ; आणि

(दोन) एखादी सोसायटी, विश्वस्त संस्था, परिसंस्था किंवा व्यक्तींचा अन्य संघ किंवा व्यक्तींचा निकाय यांच्या संबंधात, "संचालक" याचा अर्थ, सोसायटीच्या, विश्वस्त संस्थेच्या, परिसंस्थेच्या किंवा अन्य संघाच्या, किंवा यथास्थिति, निकायाच्या कामकाजाच्या व्यवस्थापनासह सोसायटीच्या, विश्वस्त संस्थेच्या, परिसंस्थेच्या किंवा अन्य संघाच्या किंवा निकायाच्या नियमांन्वये किंवा उप विधिअन्वये हितसंबंधित असलेली व्यक्ती, असा आहे.

नियम करण्याचा अधिकार.

५६. (१) शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनांत मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता सत्रासीन असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, असा निर्णय, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे, त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

संक्रमणकालीन तरतूद.

५७. त्याकाळी अस्तित्वात असलेल्या शासकीय आदेशांनुसार किंवा शासननिर्णयांनुसार स्वयं-अर्थसहाय्यित कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्याची प्रक्रिया, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी एखाद्या विशिष्ट टप्प्यावर पूर्ण झाली असेल तर, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, या अधिनियमातील तरतुदींनुसार अशा पुढील टप्प्यापासून अशी प्रक्रिया नियमितपणे सुरू राहील.

निरसन व व्यावृत्ती.

५८. (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व तेव्हापासून पुढील अधिनियम निरसित होतील :–

(क) अॅटलास स्किलटेक विद्यापीठ मुंबई अधिनियम, २०२१ ; — २०२१ चा महा. १५.

(ख) आयटीएम कौशल्य विद्यापीठ नवी मुंबई अधिनियम, २०२२ ; — २०२३ चा महा. १०.

(ग) जी. एच. रायसोनी आंतरराष्ट्रीय कौशल्य तंत्र विद्यापीठ, पुणे अधिनियम, २०२३ ; — २०२४ चा महा. ९.

(घ) जी. एच. रायसोनी कौशल्य तंत्र विद्यापीठ, नागपूर अधिनियम, २०२३ ; — २०२४ चा महा. १०.

(ङ) युनिव्हर्सल स्किलटेक विद्यापीठ, वसई अधिनियम, २०२३ ; — २०२४ चा महा. १४.

(२) उक्त अधिनियमांचे निरसन झाले असले तरीही,–

(एक) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी विद्यमान कौशल्य विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून पद धारण करणारी कोणतीही व्यक्ती, अशा प्रारंभापासून तत्सम कौशल्य विद्यापीठाचा कुलगुरू असेल आणि पूर्वोक्तप्रमाणे त्याचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी, मृत्यू, राजीनामा किंवा अन्य कारणांमुळे तो कुलगुरू असण्याचे बंद झाला नसेल तर, त्याने असे पद धारण केले असते त्याप्रमाणे त्याचा पदावधी समाप्त होईपर्यंत विद्यमान विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून उक्त पद धारण करण्याचे चालू राहील आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये तत्सम विद्यापीठाच्या कुलगुरूला प्रदान केलेल्या आणि त्याच्यावर सोपविण्यात आलेल्या सर्व अधिकारांचा वापर करण्याचे व सर्व कर्तव्ये पार पाडण्याचे चालू ठेवील ;

(दोन) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी घटित केलेल्या विद्यमान कौशल्य विद्यापीठाचे प्रत्येक प्राधिकरण हे, या अधिनियमाखालील तत्सम विद्यापीठाचे तत्सम प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल ;

(तीन) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास विद्यमान कौशल्य विद्यापीठाचे, एकतर अधिकारी किंवा कर्मचारी (मग ते अध्यापन करणारे किंवा अन्य कर्मचारी असोत) म्हणून पद धारण करणारी प्रत्येक व्यक्ती, अशा दिनांकाच्या लगतपूर्वी, तिला ज्या लागू होत्या त्याच अटी व शर्तींवर, नियमितपणे पद धारण करील, आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये तिला जे प्रदान करण्यात आलेले आहेत अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील ;

(चार) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाची सर्व जंगम किंवा स्थावर मालमत्ता, आणि सर्व हक्क, कोणत्याही प्रकारचे हितसंबंध, अधिकार व विशेषाधिकार हे, तत्सम विद्यापीठाकडे हस्तांतरित होतील आणि आणखी कोणत्याही हमीशिवाय तत्सम विद्यापीठाकडे निहित होतील आणि ज्या उद्दिष्टांसाठी व प्रयोजनांसाठी विद्यापीठ घटित करण्यात आले आहे त्या प्रयोजनांसाठी व उद्दिष्टांसाठी त्यांचा वापर करण्यात येईल ;

(पाच) विद्यमान कौशल्य विद्यापीठाने स्वीकारलेल्या किंवा त्यांना मिळालेल्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी त्यांनी धारण केलेल्या सर्व देणग्या, या अधिनियमाखालील तत्सम विद्यापीठाने स्वीकारलेल्या किंवा त्याला मिळालेल्या किंवा त्याने धारण केलेल्या असल्याचे मानण्यात येईल आणि ज्या शर्तींवर अशा देणग्या स्वीकारल्या किंवा मिळाल्या किंवा धारण केल्या होत्या त्या सर्व शर्ती, या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींशी विसंगत असल्या तरीही, या अधिनियमान्वये विधिग्राह्य असल्याच्या मानण्यात येतील ;

(सहा) विद्यमान कौशल्य विद्यापीठाने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी पत्करलेली आणि त्याच्या नावे वैधरीत्या अस्तित्वात असलेली सर्व कर्जे, दायित्वे व आबंधने, तत्सम विद्यापीठाकडून परतफेड करण्यात येतील व त्याची पूर्तता करण्यात येईल ;

(सात) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, विद्यमान कौशल्य विद्यापीठाच्या नावे केलेले कोणतेही मृत्यूपत्रित दान, बक्षिस, आबंधन किंवा विश्वस्त निधी यांचा अंतर्भाव असलेले कोणतेही इच्छापत्र, विलेख किंवा अन्य दस्तऐवज यांचा, या अधिनियमाच्या प्रारंभास व तेव्हापासून, त्यात जणू काही विद्यमान विद्यापीठाऐवजी तत्सम विद्यपीठाचे नाव दिलेले आहे असे समजून अन्वयार्थ लावण्यात येईल ;

(आठ) कोणत्याही अधिनियमितीमधील किंवा कोणत्याही अधिनियमिती अन्वये काढलेल्या इतर संलेखांतील कोणत्याही विद्यमान कौशल्य विद्यापीठाच्या सर्व संदर्भांचा, जणू काही तो तत्सम विद्यापीठाचा संदर्भ आहे असे समजून, त्याचा अन्वयार्थ लावण्यात येईल ;

(नऊ) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही विद्यमान कौशल्य विद्यापीठाच्या बाबतीत, उक्त अधिनियमान्वये जे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त अध्यापक होते असे अध्यापक, या अधिनियमान्वये आणि अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, तत्सम विद्यापीठाचे मान्यताप्राप्त अध्यापक असल्याचे मानण्यात येतील आणि या अधिनियमानुसार नवीन मान्यता देण्यात येईपर्यंत, ते असे मान्यताप्राप्त अध्यापक म्हणून असण्याचे चालू राहतील ;

(दहा) कोणत्याही विद्यमान कौशल्य विद्यापीठाच्या बाबतीत, उक्त अधिनियमांन्वये केलेले सर्व नियम, परिनियम, आदेश किंवा विनियम, जेथवर ते या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहतील आणि या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे, परिनियमांद्वारे, आदेशांद्वारे किंवा विनियमांद्वारे ते अधिक्रमित करण्यात येईपर्यंत अथवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, ते, तत्सम विद्यापीठाच्या किंवा यथास्थिति, त्या विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या बाबतीत, या अधिनियमान्वये करण्यात आले असल्याचे मानण्यात येतील ;

(अकरा) उक्त अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये कोणत्याही प्राधिकरणाने दिलेल्या किंवा काढलेल्या सर्व नोटिसा व आदेश हे, जेथवर ते या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहतील आणि या अधिनियमान्वये ते अधिक्रमित करण्यात येईपर्यंत अथवा त्यांत फेरबदल करण्यात येईपर्यंत तत्सम प्राधिकरणाने दिलेले आदेश किंवा काढलेल्या नोटिसा असल्याचे मानण्यात येतील :

परंतु, या कलमाद्वारे निरसित केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये केलेले किंवा काढलेले आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले कोणतेही नियम, परिनियम, आदेश, विनियम, नोटिसा अथवा आदेश हे, या अधिनियमान्वये असे नियम, परिनियम, आदेश, विनियम, नोटीस किंवा आदेश नियम करण्याचा अथवा काढण्याचा अधिकार, वेगळ्या प्राधिकरणात अथवा मंडळात किंवा अधिकाऱ्याकडे निहित आहे या, अथवा त्याचा प्रतिपाद्य विषय हा, या अधिनियमान्वये करावयाच्या दुय्यम विधिविधानाच्या अथवा संलेखाच्या वेगळ्या स्वरूपात अनुज्ञेय आहे केवळ या कारणांवरून या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत आहे असे मानण्यात येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

५९. (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्भवल्यास, शासनास, प्रसंगानुरूप उद्भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट असल्याचे वाटेल अशी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यावर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या अनुसूचीची सुधारणा.

६०. (१) महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यास जोडलेल्या अनुसूचीमधील, सिम्बॉयोसिस कौशल्य व व्यावसायिक विद्यापीठ, पुणे यांच्याशी संबंधित असणारी नोंद ८ वगळण्यात येईल. २०२४ चा महा. ८

(२) उक्त नोंद वगळली असली तरीही, उक्त विद्यापीठ, सिम्बॉयोसिस कौशल्य व व्यावसायिक विद्यापीठ अधिनियम, २०१७ अन्वये ज्या उद्दिष्टासाठी घटित केले होते, त्याच उद्दिष्टांसाठी, या अधिनियमाखाली स्थापन करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल ; आणि या अधिनियमाच्या तरतुदी अशा विद्यापीठास लागू असतील. २०१७ चा महा. ३७.

अनुसूची

भाग एक

(कलम ६ (४) पहा)

अ.क्र.	विद्यमान विद्यापीठाचे नाव	या अधिनियमाखालील संबंधित विद्यापीठाचे नाव, ठिकाण व मुख्यालये	प्रायोजक मंडळाचे नाव व पत्ता (नोंदणी क्रमांकासह)
(१)	(२)	(३)	(४)
१.	अॅटलास स्किलटेक विद्यापीठ, मुंबई अधिनियम, २०२१ (२०२१ चा महा. १५) अन्वये स्थापन केलेले अॅटलास स्किलटेक विद्यापीठ, मुंबई.	अॅटलास स्किलटेक विद्यापीठ, मुंबई, इक्विनॉक्स बिजनेस पार्क, टॉवर क्र. १, इमारत ए, सिटीएस क्रमांक ८३, ८३/१ ते १९, कुर्ला गाव, तालुका कुर्ला, एलबीएस मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७०.	फ्युचर टेक्नॉलॉजी स्किल्स फाउंडेशन सीआयएन क्रमांक यु. ८०३०१ एमएच २०२१, एनपीएल ३५४९७८, याचे ५ डी, तिसरा मजला, कुलसुम टेरेस, ७ वॉल्टन मार्ग, कुलाबा मुंबई ४०० ००१ येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली, कंपनी अधिनियम, २०१३ याच्या कलम ८ अन्वये नोंदणीकृत केलेली एक कंपनी.
२.	आयटीएम कौशल्य विद्यापीठ, नवी मुंबई अधिनियम, २०२२ (२०२३ चा महा. १०) अन्वये स्थापन केलेले आयटीएम कौशल्य विद्यापीठ, नवी मुंबई.	आयटीएम कौशल्य विद्यापीठ, नवी मुंबई, प्लॉट क्रमांक २५ व २६, संस्थेचे क्षेत्र, सेक्टर ४, खारघर नवी मुंबई ४१० २१०.	आयटीएम ट्रस्ट, नोंदणी क्रमांक इ १४७४५/ एमयुएम, दिनांक ८ ऑक्टोबर, १९९३, याचे प्लॉट क्रमांक २५ व २६, संस्थेचे क्षेत्र, सेक्टर ४, खारघर, नवी मुंबई ४१० २१० येथे सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणीकृत केलेला एक सार्वजनिक धर्मादाय न्यास.
३	जी. एच. रायसोनी आंतरराष्ट्रीय कौशल्य तंत्र विद्यापीठ, पुणे अधिनियम, २०२३ (२०२४ चा महा. ९) अन्वये स्थापन केलेले जी. एच. रायसोनी आंतरराष्ट्रीय कौशल्य तंत्र विद्यापीठ पुणे.	जी. एच. रायसोनी आंतरराष्ट्रीय कौशल्य तंत्र विद्यापीठ, पुणे, गट नं. ३०, ४२/१, ४२/२, ४३, ४४, ४७ व ४९, द्वारका दूध जवळ, पुणे-सोलापूर हायवे, केडगाव, दौंड, पुणे ४१२ २०७.	एस.जी.आर. फाऊंडेशन, नागपूर, सीआयएन क्रमांक. यू ८०९०३ एमएच २०२१ एनपीएल ३६३४१९, याचे ३४५, श्रद्धा हाऊस, सहावा

अनुसूची–चालू

	(२)	(३)	(४)
			मजला, किंग्सवे, नागपूर ४४० ००१ येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली, कंपनी अधिनियम, २०१३ याच्या कलम ८अन्वये नोंदणीकृत केलेली एक कंपनी.
४	जी. एच. रायसोनी कौशल्य तंत्र विद्यापीठ, नागपूर अधिनियम, २०२३ (२०२४ चा महा. १०) अन्वये स्थापन केलेले जी. एच. रायसोनी कौशल्य तंत्र विद्यापीठ, नागपूर.	जी. एच. रायसोनी कौशल्य तंत्र विद्यापीठ, नागपूर, प्लॉट नं. ३७-३९/१, ३९, श्रद्धा पार्क, हिंगणा-वाडी लिंक रोड, नागपूर ४४० ००१.	अंकुश शिक्षण संस्था, नागपूर, सीआयएन क्र. यू ८०१००एमएच२०२१ एनपीएल ३६७१८८, याचे ३४५, श्रद्धा हाऊस, सहावा मजला, किंग्सवे, नागपूर ४४० ००१ येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली, कंपनी अधिनियम, २०१३ याच्या कलम ८ अन्वये नोंदणीकृत केलेली एक कंपनी.
५	युनिव्हर्सल स्किलटेक विद्यापीठ, वसई अधिनियम, २०२३ (२०२४ चा महा. १४) अन्वये स्थापन केलेले युनिव्हर्सल स्किलटेक विद्यापीठ, वसई.	युनिव्हर्सल स्किलटेक विद्यापीठ, वसई, युनिव्हर्सल कॅम्पस, भजनलाल डेअरी आणि पुण्यधाम जवळ, कामन-भिवंडी रोड, वसई ४०१ २०८.	विद्या विकास एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई, नोंदणी क्रमांक इ २११६३/ एमयुएम दिनांक १९ ऑगस्ट, २००३ याचे किल्ला बिल्डींग, दफ्तरी रोड, रेल्वे स्टेशन समोर, मालाड पूर्व, मुंबई ४०० ०९७ येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली, सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणीकृत केलेला एक सार्वजनिक धर्मादाय न्यास.

अनुसूची—समाप्त

(१)	(२)	(३)	(४)
६.	सिम्बॉयोसिस कौशल्य व व्यावसायिक विद्यापीठ अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ३७) अन्वये स्थापन केलेले सिम्बॉयोसिस कौशल्य व व्यावसायिक विद्यापीठ, पुणे.	सिम्बॉयोसिस कौशल्य व व्यावसायिक विद्यापीठ, पुणे, मुख्यालय किवळे, पिंपरी-चिंचवड महानगर-पालिका क्षेत्र, पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग, पुणे.	सिम्बॉयोसिस मुक्त शिक्षण सोसायटी, पुणे.

अनुसूची
भाग दोन
(कलम ६ (१) पहा)

अ.क्र. (१)	विद्यापीठाचे नाव, ठिकाण व मुख्यालये (२)	प्रायोजक मंडळाचे नाव व पत्ता (३)
*	*	*
*	*	*

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE

अनुसूचित

भाग दोन

(कलम ६ (१) पहा)

अ.क्र. (१)	विद्यमान विद्यापीठाचे नांव (२)	या अधिनियमाखालील संबंधित विद्यापीठाचे नाव, ठिकाण व मुख्यालये (३)	प्रायोजक मंडळाचे नाव व पत्ता (नोंदणी क्रमांकासह) (४)
१	महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ ॲक्ट २०२४ क्र. ३९	शिवराया महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुख्यालय - सोलापूर ठिकाण - तडवळ ता.अक्कलकोट जि.सोलापूर	अनुराग कृषी शिक्षण संशोधन संस्था ट्रस्ट ऑफ इंडिया नॅक अकोरेडेशन प्रपोजलस, यामिनी नगर, विजापूर रोड, सोलापूर

President
Shivaraya Maharashtra State Skill University
Tadawal,Tal.Akkalkot,Dist.Solapur-413219

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR: DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.